सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. १८ एप्रिल २०२५ ◂◂ वर्ष - तिसरे ◂◂ अंक १७ ◂◂ पाने : ८ ◂◂ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अभ्यासक्रमात 'हिंदी' सक्तीवरुन राज ठाकरे आक्रमक; सरकारला दिला थेट इशारा - 'लादाल, तर संघर्ष अटळच!'

### 'महाराष्ट्र सैनिकांनो, तूर्तास थांबा'

मुंबई : राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात हिंदी सक्तीने लादण्याच्या निर्णयावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे. महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी शिकवण्याची सक्ती आम्ही खपवून घेणार नाही. जर ही सक्ती सुरूच राहिली, तर संघर्ष अटळ आहे, असा रोखठोक इशारा त्यांनी दिला आहे.

'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४' नुसार आता तिसरी भाषा म्हणून हिंदी अनिवार्य करण्यात आली आहे. यामुळे मनसे आक्रमक झाली असून, शालेय पातळीवर हिंदी लादण्याचा निर्णय तात्काळ मागे घ्या, अशी मागणी राज ठाकरे यांनी केली आहे.

हिंदी ही राष्ट्रभाषा नाही!

राज ठाकरे म्हणाले, हिंदी ही एक राज्यभाषा आहे, राष्ट्रभाषा नव्हे. मग ती महाराष्ट्रात सक्तीने शिकवण्याचा अधिकार कुणाला आहे? त्रिभाषा सूत्र हे सरकारी व्यवहारापुरतं असावं, ते थेट शिक्षणात आणण्याचा सरकारचा डाव धोकादायक आहे.

हिंदू आहोत, पण हिंदी नाही!

मराठी अस्मिता जोपासणाऱ्या राज ठाकरे यांनी भावनिक भाषेत हल्लाबोल करत म्हटलं, आम्ही हिंदू आहोत पण हिंदी नाही. महाराष्ट्रावर हिंदीकरणाचा मुलामा दिला, तर संघर्ष होणारच. सरकारचा हा हेतुपूरस्सर डाव आहे. मराठी विरुद्ध मराठीतर संघर्ष उभा करून निवडणुकीसाठी राजकीय पोळी भाजण्याचा हा प्रयत्न आहे.

फक्त महाराष्ट्रातच का सक्ती?

ठाकरे यांनी थेट सवाल केला आहे की, दक्षिणेच्या राज्यात हिंदी सक्ती करून दाखवा ना! तिथली सरकारं पेटून उठतील. मग ही जबरदस्ती महाराष्ट्रातच



का? त्याचबरोबर त्यांनी इशारा दिला की, हिंदी पुस्तकांची विक्रीही मनसे थांबवणार आहे, आणि शाळांमध्ये ती विद्यार्थ्यांना वाटू दिली जाणार नाही.

सरकारला स्पष्ट शब्दांत इशारा

आमचं सरकारला शेवटचं आवाहन आहे की, लोकभावनेचा आदर करा आणि हा निर्णय तात्काळ मागे घ्या. अन्यथा संघर्ष अटळ असेल आणि त्याला जबाबदार फक्त सरकारच राहील, असा ठणठणीत इशारा ठाकरे यांनी दिला.

मीडिया आणि राजकीय पक्षांनाही साद

राज ठाकरे यांनी मराठी माध्यमं आणि इतर राजकीय पक्षांनाही यामध्ये भूमिका घ्यावी, असं आवाहन केलं आहे. आज भाषा लादत आहेत, उद्या आणखी काय काय लादतील – ही वेळच सावध होण्याची आहे, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, 'हिंदी लादाल, तर संघर्ष अटळ' हा राज ठाकरे यांचा सरकारला स्पष्ट इशारा, आणि मराठी अस्मितेचा वणवा पुन्हा एकदा पेटण्याची शक्यता.

नेमकं काय म्हणाले राज ठाकरे?

राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतो की ही सक्ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना खपवून घेणार नाही. सरकारचं सध्या जे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची ? तुमचं त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे, ते सरकारी व्यवहारांपुरतंच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. या देशात भाषावार प्रांतरचना झाली, आणि ती इतकी वर्ष टिकली. पण आत्ताच ही दुसऱ्या प्रांताची भाषा इथे महाराष्ट्रावर लादण्याचे का प्रकार सुरु झालेत? भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच हरताळ फासला जात आहे. प्रत्येक भाषा ही सुंदरच असते आणि तिच्या घडण्याच्या मागे एक दीर्घ इतिहास असतो, परंपरा असते. आणि ती ज्या राज्याची भाषा असते, त्या राज्यात तिचा सन्मान राखलाच गेला पाहिजे. महाराष्ट्रात जसा मराठीचा सन्मान इतर भाषिकांकडून राखला गेला पाहिजे, तसा सन्मान इतर राज्यात त्या भाषेचा सर्व भाषिकांकडून राखला गेला पाहिजे.

## नव्या वक्फ कायद्याला स्थगिती नाहीच : सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली : नव्या वक्फ कायद्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला त्यांची बाजू मांडण्यासाठी सात दिवसांची मुदत दिली आहे. पुढील सुनावणी पाच मे रोजी होणार आहे. पुढील निर्णय होईपर्यंत नव्या वक्फ कायद्याद्वारे मालमत्तांवर कारवाई करता येणार आहे. पण नवीन दुरुस्ती कायद्याअंतर्गत कौन्सिलमध्ये किंवा बोर्डमध्ये कोणतीही नियुक्ती केली जाणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाने आदेशात लिहिले आहे की, सरकार पुढील तारखेपर्यंत नोंदणीकृत आणि राजपत्रित मालमत्ता (वक्फ-बाय-यूजर) डी-नोटिफाय करणार नाही. तथापि, सरकार इतर मालमत्तांवर कारवाई करण्यास स्वतंत्र आहे. केंद्राने न्यायालयाला सांगितले की तुम्ही संसदेने मंजूर केलेल्या कायद्याला स्थगिती देऊ शकत नाही आणि केंद्र दैनंदिन सुनावणीसाठी तयार आहे.



वक्फ विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विधेयकावर स्वाक्षरी केली. यानंतर वक्फ दुरुस्ती विधेयक २०२५ चे कायद्यात रुपांतर झाले. नवा वक्फ कायदा एप्रिल २०२५ मध्ये लागू झाला. या कायद्याला अनेक याचिकांद्वारे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने इंडी आघाडीतील नेते आणि त्यांच्याशी संबंधित मुसलमानांच्या संघटना आहेत.

सुधारित वक्फ विधेयकाच्या बाजूने लोकसभेत २८८ आणि विरोधात २३२ मते पडली होती. तसेच सुधारित वक्फ विधेयकाच्या बाजूने राज्यसभेत १२८ आणि विरोधात ९५ मते पडली होती. लोकसभेत १२ तास आणि राज्यसभेत १४ तास विधेयकावर चर्चा झाली होती. चर्चेअंती विधेयक मंजूर झाले होते.

## अजित पवारांच्या दौऱ्यात ८० पाड्यावरील महिला वाजवणार हंडे

इगतपुरी, १७ एप्रिल – पाणीटंचाई तालुक्याच्या पाचवीला पुजली आहे पैसे खर्च करूनही योजना केल्या जातात पण पाण्याचे माहेरघर असलेल्या इगतपुरी तालुक्यातच भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागते यामुळे संतप्त झालेल्या तालुक्यातील ८० आदिवासी पाड्यातील नागरिक एकत्र येऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर रिकामे हांडे वाजविणार आहे. इगतपुरी तालुक्यात ८० आदिवासी पाडे पाणी टंचाईच्या तीव्र झळा सोसत आहेत. नागरिकांच्या करातून मंजूर झालेल्या पाण्याच्या योजना कुचकामी ठरल्या असून ठराविक लोकांच्या पोटात योजनांचा पैसा गेला आहे. फक्त भ्रष्टाचार करण्यासाठीच कोट्यवधी रुपयांच्या पाणी योजना राबवल्या गेल्या आहेत. तालुका प्रशासन , राजकारणी लोकांच्या हातातील बाहुले बनले गेल्याचे चित्र आहे. दरवर्षी पाणीटंचाई असूनही प्रशासन कोणत्याही उपाययोजना करीत नाही. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुका रखडलेल्या असल्याने अधिकाऱ्यांचे राज्य नागरिकांच्या मुळावर बसले आहे. विधानसभा लोकसभा निवडणुकीवेळी लोकांना विकासाचे गाजर दाखवून लोकांच्या जिव्हाळ्याच्या विषयावर मौन धरणाऱ्या आमदार – खासदारांनी लोकांकडे पाठ फिरवली आहे. घोटी शहरात निवडणुकीवेळी उपमुख्यमंत्री . अजित पवार यांनी अनेकानेक आश्वासने देऊन मते मागितली होती. म्हणून इगतपुरी तालुक्यातील ८० आदिवासी पाड्यावरील आदिवासी महिला, युवती आणि नागरिक येत्या २० एप्रिलला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दौऱ्यावेळी रिकामे हंडे वाजवून आंदोलन करणार आहेत.

## माजी आयपीएस के. अण्णामलाई मंत्री होणार? केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होणार ?

नवी दिल्ली : लवकरच केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे. तसेच तामीळनाडू भाजपाचे माजी अध्यक्ष आणि माजी आयपीएस के. अण्णामलाई यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश होण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. या भेटीनंतर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी पक्षाच्या नेत्यांची उच्चस्तरिय बैठक झाली. गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, वाणिज्य मंत्री पियुष गोयल, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि इतर वरिष्ठ नेते चर्चेसाठी



उपस्थित होते. ही बैठक बराच काळ चालली. या बैठकीत अनेक मुद्यांवर चर्चा झाली. देशासमोरचे प्रश्न, पक्षापुढील आव्हाने, कोणत्या समस्येला सोडवण्यासाठी कोणती व्यक्ती सक्षम आहे अशा अनेक मुद्यांवर चर्चा झाली. चर्चेची जास्त माहिती बाहेर आलेली नाही. पण एरवी बुधवारी होत असलेली मंत्रिमंडळाची बैठक अचानक रद्द झाली. यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चेने जोर धरला आहे.

तामीळनाडू आणि बिहार या दोन राज्यांशी संबंधित निवडक नेत्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची दाट शक्यता आहे. तसेच विशेष कामगिरी न केलेल्या काही मंत्र्यांचे राजीनामे घेतले जाण्याचीही शक्यता आहे. वर्षभरात तामीळनाडू आणि बिहार या दोन मोठ्या राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार करताना या मुद्याचा हमखास विचार होईल, असे राजकीय अभ्यासकांचे मत आहे.

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावर उपराष्ट्रपती चिंतीत

नवी दिल्ली, १७ एप्रिल : राज्यपालांकडे प्रलंबित विधेयकांवर राष्ट्रपतींनी ३ महिन्यात निर्णय घ्यावा असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने ८ एप्रिल रोजी दिले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी चिंता व्यक्त केली आहे. भारताने अशा लोकशाहीची कधीच कल्पना केली नव्हती अशी प्रतिक्रिया उपराष्ट्रपतींनी दिली.

गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांना मान्यता देण्यासाठी अंतिम मुदत दिली होती. यावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालये राष्ट्रपतींना आदेश देऊ शकत नाहीत, असे उपराष्ट्रपती म्हणाले. न्यायालयांना राष्ट्रपतींना निर्देश द्यावे लागतील अशी परिस्थिती आपण निर्माण करू शकत नाही, असे जगदीप धनखड यांनी सांगितले. संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत न्यायालयाला देण्यात आलेले विशेष अधिकार हे आता लोकशाही शक्तींविरुद्ध क्षेपणास्त्र बनल्याचेही धडखड म्हणालेत. भारताने अशा लोकशाहीची कल्पनाही केली नव्हती जिथे न्यायाधीश कायदे करतील आणि सुपर पार्लमेंट म्हणून काम करतील. नुकत्याच एका निर्णयाद्वारे राष्ट्रपतींना निर्देश देण्यात आले आहेत. पण आपण कुठे चाललोय ? आपल्या देशात हे काय चालले आहे ? आपण अत्यंत संवेदनशील असले पाहिजे. आपण हा दिवस पाहण्यासाठी लोकशाहीची कल्पना केली नव्हती. राष्ट्रपतींना वेळेवर निर्णय घेण्यास सांगितले जाते आणि जर तसे झाले नाही तर ते कायदा बनवले जातात असे उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले.

## भावानेच केला मोठ्या भावाचा खुन

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि.१७ एप्रिल-**

नातं म्हणलं तर ते जिवापाड जपलं जातं. मग ते आई वडील, भावा भावाचं असो की भाऊ बहीणीचं असो. ही नाती सर्व नात्याच्या पलीकडची असतात. पण याच नात्याला काही जण डाग लावण्याचं काम करतात. त्यामुळे नात्यावरूनही अनेकांचा विश्वास उडून जाते. तशीच सर्वांना हादरवून सोडणारी घटना नांदेड जिल्ह्यातील बिलोली इथं घडली आहे. या घटनेनं सर्वच जण हादरून गेले आहेत. शिवाय सख्खा भाव आपल्या सख्ख्या मोठ्या भावा बरोबर असं काही भयंकर करू शकतो का? याची चर्चा सगळीकडे रंगली आहे.

ही अंगावर काटा आणणारी भयंकर घटना नांदेड जिल्ह्यातील बिलोली शहरात घडली आहे. बिलोली शहरात सुनिल प्रल्हाद लाखे आणि नागेश प्रल्हाद लाखे हे दोघे सख्खे भाव राहात होते. सुनिल हा मोठा तर नागेश हा छोटा भाऊ होता. शहरापासून तीन किलो मिटरवर सुलतानपुर येथे या दोघांची वडीलोपार्जीत शेती होती. याच शेतीवरून या दोघांमध्या वाद होता. शिवाय पैशाच्या देवाण घेवाण वरून ही त्यांच्यात सतत भांडणं ही होत होती. मात्र हे भांडण अगदी टोकाला गेलं. ते इतकं की भाऊ भावाच्या जीवावर उठवा. त्यातूनच लहान भावाने भयंकर कृत्य करण्याचा निर्णय घेतला. त्याने मोठा भाऊ असलेल्या सुनिल यांच्यावर धारधार शस्त्राने वार केला. या हल्ल्यात सुनिल यांचा जागीच मृत्यू झाला. भावालाच खल्लास केल्यानंतर नागेशने तिथून पळ काढला. झालेल्या घटनेची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानंतर बिलोली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. शिवाय आरोपी नागेश याला ही अटक करण्यात आली आहे. दरम्यान या घटनेनं संपूर्ण शहर हादरून गेलं आहे. शिवाय भावाने भावाचा खून केल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## विठुरायाच्या भक्तांना मोफत प्रसाद मिळणार!

सोलापूर : अठ्ठावीस युग विटेवर उभा असलेल्या विठुरायासाठी एक भेट व्हावी म्हणून भक्त लांबून दर्शनासाठी येतात. टाळ मृदूंगाच्या गजरात वारीसोबत न थकता



भाविक पंढरपूरला दर्शनाला येतात. या विठ्ठल भक्तांसाठी एक आनंदाची बातमी आहे. तिरुपती बालाजी देवस्थानच्या धर्तीवर पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिर समितीने विठ्ठल दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मोफत प्रसाद देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी येत्या आषाढी वारीपासून करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने मंदिर समितीने तयारी सुरू केली आहे. मंदिर समितीच्या या निर्णयाचे भाविकांमधून स्वागत केले जात आहे.

पंढरपूर येथे विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येतात. दर्शन रांगेतून विठ्ठल रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन व मुख दर्शन घेणाऱ्या भाविकांना विठुरायाचा मोफत प्रसाद देण्याचा निर्णय घेतला आहे. तिरुपती बालाजीचे दर्शन घेतल्यानंतर तेथील देवस्थानाकडून भाविकांना बुंदीचा प्रसाद दिला जातो. त्याचप्रमाणे विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतल्यानंतर मंदिर समितीने भाविकांना मोफत प्रसाद द्यावा, अशी अनेक वर्षांपासूनची मागणी आहे.

## रितेश देशमुखने केले चाहत्यांजवळ मदतीचे आवाहन

मुंबई : अवघ्या जगाला वेड लावणारा अभिनेता म्हणून रितेश देशमुखची खास ओळख आहे. रितेशने आजपर्यंत मराठी हिंदी अशा दोनी माध्यमांतील सिनेसृष्टीसाठी काम केले आहे. लय भारी चित्रपटापासून ते वेड चित्रपटापर्यंत रितेशने चाहत्यांची मने जिंकली. आता रितेशचा नवीन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मात्र तत्पूर्वी रितेशने त्याच्या चाहत्यांजवळ मदत मागितली आहे.

रितेश देशमुख हा नेहमीच चर्चेत असतो. विकी कौशलच्या 'छावा' चित्रपटानंतर आता रितेशचा 'राजा शिवाजी' हा नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट शिवाजीमहाराजांवर आधारित आहे. काही दिवसांपूर्वी रितेशचा एक लूक व्हायरल झाला होता त्यानंतर चर्चांना उधाण आले होते. फेब्रुवारी २०२४ मध्ये रितेशने या चित्रपटाचे पोस्टर समाज माध्यमांवर पोस्ट केले होते. त्यानंतर आज रितेशने त्याच्या सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केली आहे. ज्या मध्ये रितेश चाहत्यांजवळ मदत मागत आहे.

काय म्हणाला रितेश ?

आम्ही आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांवर चित्रपट काढत आहोत. त्या चित्रपटाचं नावं 'राजा शिवाजी' आहे. आम्ही या चित्रपटाचं टायटल लोगोच्या शोधात आहोत. आपल्यापैकी कोणी जर डिझाइनर असेल,कोणी कॅलिग्राफी आर्टिस्ट असतील तर कृपया आपण या चित्रपटावर आपले डिझाइन तयार करावेत आणि खाली दिलेल्या ईमेलच्या पत्त्यावर पाठवावे. ज्यांचं डिजाईन या चित्रपटासाठी निवडलं जाईल त्यांना आम्ही क्रेडिट देऊ. हा चित्रपट आपला स्वतःचा आहे असं समजून कृपया डिजाईन तयार करा असं अभिनेता रितेश देशमुख म्हणाला. दरम्यान तरुणांसाठी ही सुवर्णसंधी आहे.

## जंगलातील वणवा रोखण्यात वन विभाग अपयशी; मौल्यवान संपत्तीचे नुकसान

### वन क्षेत्रातील वनपरिक्षेत्र अधिकारी जिल्ह्याला तर कर्मचारी तालुक्याला वास्तव्यास

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१७ एप्रिल – कन्नड तालुका हा वनसमृदीने नटलेला गौताळा अभयारण्यासारखे अभयारण्य तालुक्यात असून याचे संवर्धन आणि संगोपनासाठी मात्र वनविभागा उदासीन असल्याचे चित्र पहायला मिळत आहे,

तालुक्यात प्रादेशिक वनविभागाच्या दोन रेंज असून त्यात कन्नड रेंज मध्ये अंदाजे ११ हजार हेक्टर तर नागद रेंज मध्ये ७५०० हजार हेक्टर त्यापैकी अर्ध क्षेत्र सोयगाव प्रादेशिक मध्ये येते तर वन्यजीवकडे कन्नड रेंजमध्ये अंदाजे १०५०० हेक्टर क्षेत्र आहे तर नागद रेंज मध्ये अंदाजे ५५०० हेक्टर क्षेत्र आहे

या क्षेत्रात वन्यप्राणी, वनस्पती, झाडे झुडपे असून यांचे संरक्षण,संवर्धन, करण्याची जबाबदारी वनपरिक्षेत्र अधिकारी, कर्मचारी यांची आहे पण काही




कालावधीपासून हे कर्तव्य हे कर्मचारी विसरले की काय असा प्रश्न पडला आहे त्याचे कारण ही तसेच आहे,उन्हाळ्यात गौताळा अभयारण्यात वारंवार वणवा पेटत असून वनसंपत्तीची मोठया प्रमाणात नुकसान होत आहे,परंतु हा वणवा नैसर्गिक कमी आणि घडविण्याचा अधिक वाटतो कारण वनपरिक्षेत्र अधिकारी हे जिल्ह्यावर वास्तवाला असून कर्मचारी कन्नड शहरांतून ये जा करत असतात त्यामुळे आपल्या बिटात काय चाललं याची कल्पना क्वचितच असते,

काही दिवसांपूर्वी शहरालगत फरारी पथकाने पिशोर रोडवर कारवाई करत एक टेम्पो,एक ट्रॅक्टर अवैध लाकडं जप्त केले होते त्याची साधी माहिती सुद्धा प्रादेशिक वनविभागाला नव्हती ही आश्चर्यजनक बाब घडली होती,शहरा लगत एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैध लाकडं होती आणि त्याची कल्पना अधिकाऱ्यांना नसावी हे नवलंच आहे,

आता तरी वनविभाग आपल्या मूल्यांची कर्तव्याप्रति प्रामाणिक राहणार आहे का ? असा सवाल उपस्थित होत आहे

पर्यावरणप्रेमींकडून होते चिंता व्यक्त

उन्हाळ्यात वनव्याच्या घटना वाढतात. पण अनेकदा त्यामागे इतरही कारणे असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वन विभागाच्या कामचुकार व दुर्लक्षामुळे संपूर्ण जंगल नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचा आरोप होत असून त्याबाबत पर्यावरणप्रेमींकडून चिंता व्यक्त करण्यात आली आहे. एकीकडे भोंगे लावून वृक्ष लागवडीची मोहीम राबविली जाते आणि दुसरीकडे जंगलात आहे ती वनसंपत्तीचे रक्षण करण्यात मात्र, वन अधिकारी व कर्मचारी अपयशी ठरत आहेत. जंगल तोडीमुळे निसर्गाचे चक्र बिघडत चालले आहे. आगामी काळात जागतिक तापमान वाढणार असून त्यावर नियंत्रणासाठीदेशात ३३% वन व्याप्त राखीव क्षेत्र असणे आवश्यक आहे. परंतु आजच्या घडीला हे प्रमाण जवळपास २०% झाले आहे. त्यातहीं वारंवार पेटत असलेल्या वणव्यामुळे जंगल नष्ट होण्यास फार वेळ लागणार नाही. शेवटी ३३% पैकी २०% वन व्याप्त क्षेत्र सुद्धा शिल्लक राहणार नाही, अशी भीतीही जिल्ह्यातील

**उन्हाळ्यापूर्वी जाळपट्टा करावा लागतो पण मोजक्याच ठिकाणी जाळपट्टा करण्यात आले,त्यामुळे वारंवार वणवा पेटणे हे होणारच आहे,त्यात खान्देश पट्ट्यातून वणवा पेटत आपल्या पट्ट्यात येत आहे**
**डॉ.प्रा.रमेश सूर्यवंशी**
**पर्यावरण प्रेमी**

**रामनगर,पळशी बुद्रुक लगत असलेल्या डोंगरावर एकदा का वणवा पेटला की तो दोन ते तीन दिवस पेटत असून याकडे मात्र वनविभागाचे लक्ष दिसून येत नाही,यामुळे मोठ्या प्रमाणात वनसंपदेचे नुकसान होत आहे,हा वणवा पेटतो की लावण्यात येतो याची चौकशी करण्यात यावी**
**अमोल मोरस्कर**
**नागरिक**

**छोटे मोठे झाडे,प्राणी या आगीत भस्मसात होत आहे,हे विदारक चित्र पाहताना मन हेलावून जाते,वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून यावर तोडगा काढावा**
**भागीनाथ निकम**
**शेतकरी**



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## कार्टुन नेटवर्क, पोगो आणि डिस्कव्हरी किड्सवर खास उन्हाळी धमाका

मुंबई – वॉर्नर ब्र. डिस्कव्हरी घेऊन आले आहेत पोगो, कार्टुन नेटवर्क आणि डिस्कव्हरी किड्सवर २०० हून अधिक तासांचा नवाकोरा कंटेंट. ब्लॉकब्लस्टर प्रीमिअर्स, सुपरहिरोज, ख्यातनाम क्रॉसओव्हर्स आणि साहसाने भारलेले अ‍ॅक्शनपट या सगळ्या खास उन्हाळी कार्यक्रमातून आपल्या प्रत्येक छोट्या प्रेक्षकासाठी काहीतरी खास असेल याची खातरजमाच त्यांनी केली आहे. त्यामुळे ब्लॉकब्लस्टर उन्हाळी सुट्ट्यांसाठी तयार रहा!वॉर्नर ब्र. डिस्कव्हरीचे दक्षिण आशियातील किड्स क्लस्टरचे प्रमुख उत्तम पाल सिंग म्हणाले, भारतभरातील कुटुंबे आणि लहान मुलांसाठी पुन्हा एकदा उन्हाळी सुट्ट्या संस्मरणीय बनवण्यास आम्ही उत्सुक आहोत. नव्या कथा, आवडती पात्रे आणि मजेशीर क्रॉसओव्हर यासह आमचे नवे कार्यक्रम तुम्हाला अधिक मनोरंजन देण्यासाठी आणि प्रेरित करण्यासाठी सज्ज आहेत. वॉर्नर ब्र. डिस्कव्हरीमध्ये आम्ही उच्च दर्जाचा, गुंतवून ठेवणारा आणि सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत कंटेंट अ‍ॅक्शन आणि विनोदाने पुरेपूर सजवून तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी बांधिल आहोत.

## कॅम्पसतर्फे नवे दालन सुरू

छत्रपती संभाजी नगर, १६ एप्रिल २०२५ – कॅम्पस या भारतातील आघाडीच्या स्पोर्ट्स आणि अथलीझर फुटवेयर ब्रँडने छत्रपती संभाजी नगर येथे नवे स्टोअर सुरू करत महाराष्ट्रात रिटेल विस्तार केला आहे. हा धोरणात्मक विस्तार ब्रँडच्या जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचून त्यांना अनोखा आणि वैविध्यपूर्ण अनुभव देण्याच्या बांधिलकीशी सुसंगत आहे. ६४० चौरस फुटांत वसलेल्या नव्या स्टोअरमध्ये कॅम्पसचे स्टायलिश आणि फंक्शनल फुटवेयर महिला तसेच पुरुषांसाठी उपलब्ध करण्यात आले आहे. ग्राहकांना इथे विविध प्रकारचे स्नीकर्स, परफॉर्मन्स शूज आणि वॉर्नर ब्रदर्स, बॅटमॅन व सुपरमॅनपासून प्रेरित कलेक्शन व लिमिटेड एडिशन्स खरेदी करता येतील. लाँचच्या निमित्ताने आणि ग्राहकांना खरेदीचे अधिक मूल्य मिळवून देण्यासाठी कॅम्पसने उद्घाटनपर ऑफर्स जाहीर केल्या आहेत. त्यामध्ये 'निवडक वस्तूंवर ४० टक्क्यांपर्यंतच्या सेल ऑफर्सचा' समावेश आहे. ग्राहकांना ब्रँडचा उच्च दर्जा आणि ऑन- ट्रेंड फॅशनेबल फुटवेयरचा अनुभव घेण्यासाठी सर्व कलेक्शन आकर्षक किंमतीत उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## 'सिंघम अगेन'चा प्रीमिअर अँन्ड पिक्चर्स वाहिनीवर

मुंबई, एप्रिल २०२५: भारतीय सिनेमासृष्टीतील सर्वांत 'सेलिब्रेटेड कॉप युनिव्हर्स' सिंघम अगेनसह टेलिव्हिजनवर अ‍ॅन्ड पिक्चर्स वाहिनीवरील आपल्या प्रीमिअरसह शनिवार, १९ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता अवतरणार आहे. आपली पॉवर-पॅक्ड अ‍ॅक्शन, पकड घेणारे कथानक आणि बॉलीवूडमधील सर्वांत मोठे सितारे असलेल्या सिंघम अगेनने रामायणाच्या कालातीत कथेतून प्रेरणा घेऊन अ‍ॅक्शनची पुनर्व्याख्या केली आहे.

## 'अग्नि'चा प्रीमिअर झी सिनेमावर!

मुंबई, एप्रिल २०२५: जेव्हा ज्वाला निर्माण होतात, तेव्हा वीरही जागे होतात. या एप्रिलमध्ये अशी एक कथा पहा ज्यात हृदयस्पर्शी थरार, रोमांचकारी गूढ, अ‍ॅक्शन आणि सखोल भावना यांचा संगम आहे. झी सिनेमा प्रस्तुत करत आहे 'अग्नि'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर रविवार २० एप्रिल दुपारी १२ वाजता, जो आपल्या देशातील 'अनसंग' हीरोजना सलाम करेल. नावाजलेले दिग्दर्शक राहुल ढोलाकिया यांनी दिग्दर्शित केलेला 'अग्नि' हा चित्रपट धाडसी अग्निशामक दलाच्या वीरांना आणि रोज आपले प्राण धोक्यात घालणाऱ्या फर्स्ट रिस्पॉन्डर्ससाठी एक आदरांजली आहे. प्रतीक गांधी, सई ताम्हणकर, सैयामी खेर आणि दिव्येंदू यांसारख्या प्रतिभावान कलाकारांसह हा चित्रपट प्रेक्षकांना इमर्जन्सी रेस्क्यू ऑपरेशन्सच्या खोल आणि थरारक जगात घेऊन जातो. या कथेत एक असे रहस्यमय इन्वेस्टीगेशन आहे, जे तुम्हाला तुमच्या खुर्चीला खिळवून ठेवेल.

# एमजीएममध्ये नावीन्यपूर्ण 'मेत्ता २०२५' उपक्रमाचा होणार शुभारंभ

### मेत्ता : माईंड्स एम्पॉवर्ड थ्रू ट्रान्सफॉर्मेटिव्ह टेक्नॉलॉजी अँड अकॅडेमिक सिनर्जी, 'एम्पॉवरिंग आयडीयाज, ट्रान्सफॉर्मिंग फ्युचर्स' विषयावर होणार विचारमंथन



छत्रपती संभाजीनगर, दि.१७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्यावतीने 'एम्पॉवरिंग आयडीयाज, ट्रान्सफॉर्मिंग फ्युचर्स' या संकल्पनेवर आधारित 'मेत्ता २०२५' (चएढढ- २०२५ - चळपवी एर्ांशीशव ढर्हीेसह ढीरपीर्षेीरींळींश ढशलहपेश्रेसू रपव -लरवशाळल ेूपशीसू) या विशेष संवाद सत्राच्या प्रथम आवृत्तीचा शुभारंभ शनिवार, दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता रूक्मिणी सभागृह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या संवाद सत्रामध्ये शिक्षण, संशोधन व उद्योग क्षेत्रातील नामवंत व्यक्ती, विचारवंत, मार्गदर्शक, तज्ज्ञ सहभागी होत असून शिक्षण व तंत्रज्ञानाच्या आगामी दिशा आणि संधी यावर ते प्रकाश टाकणार आहेत. या संवाद सत्रामध्ये सहभागी होणारे हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वक्ते विविध विषयांवर आपले मार्गदर्शन करणार असून शिक्षक व संशोधकांशी संवाद साधणार आहेत.

एमजीएम विद्यापीठाने स्थापनेपासून शिक्षण, संशोधन, कौशल्य व प्रशिक्षण यावर भर देऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली आहे. विशेषत: विद्यापीठाने समकालीन काळाची आवश्यकता लक्षात घेऊन नवीन व नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले आहेत. सन २०२३-२४ वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजवणी करण्यात आली असून विविध विषयांमध्ये मेजर - मायनर अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. विद्यापीठात सध्या जवळपास ३०० शैक्षणिक अभ्यासक्रम ७ विद्याशाखांमध्ये सुरू असून विद्यार्थी भविष्यात आवश्यक असलेली क्षमता व कौशल्य या माध्यमातून प्राप्त करत आहेत.

विद्यापीठाच्या विकासामध्ये विविध क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन संवादाच्या माध्यमातून प्राप्त होण्याकरिता एक नावीन्यपूर्ण उपक्रम म्हणजे 'मेत्ता' सुरू करण्यात येत आहे. या उपक्रमाची पहिली आवृत्ती दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी या संवादाच्या आयोजनातून करण्यात येत आहे. हा उपक्रम दरवर्षी विद्यापीठात आयोजित करण्यात येणार असून विद्यापीठाच्या विकासात जागतिक दर्जाचे तज्ञ या माध्यमातून सहभागी होणार आहेत. अशाप्रकारच्या उपक्रमांतून विद्यापीठ उच्च शिक्षण संशोधनात उत्कृष्ट दर्जा प्राप्त करण्यात यशस्वी होईल.

'मेत्ता २०२५' मध्ये सहभागी होणारे तज्ञ खालीलप्रमाणे आहेत :

१. पद्मभूषण प्रा.डॉ. विजय भटकर, जागतिक ख्यातीचे संगणक शास्त्रज्ञ विषय: उच्च शिक्षणाचे जागतिकीकरण व आंतरराष्ट्रीयीकरण २. प्रा. डॉ. के. व्ही. काळे, कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे विषय: क्वांटम टेक्नॉलॉजी आणि डिजिटल पेडॅगॉजी ३. प्रा. डॉ. प्रशांत बोकारे, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली विषय: महाराष्ट्रातील शिक्षण - पुढील पाच वर्षे ४. प्रा. रजनीश कामत, कुलगुरू, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई विषय: उद्योग- संलग्न शिक्षणकक्ष - डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचा ५. प्रा. डॉ.सुनील भागवत, संचालक, भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था, पुणे (खखडएठ) विषय: प्रयोगशाळेपासून बाजारपेठेपर्यंत - नवप्रवर्तन आणि उद्योजकता ६. श्री. कैलास देसाई, व्यवस्थापकीय संचालक, एन्ड्रेस अँड हाऊसर इंडिया, मुंबई विषय: उद्योग-शैक्षणिक सुसंवाद सशक्त करणे: अपेक्षांची जुळवाजुळव आणि भविष्यकालीन कुशल मनुष्यबळाची घडण ७. सौ. मोहिनी केळकर, संचालिका, ग्राइंड मास्टर मशिन्स प्रा. लि. छत्रपती संभाजीनगर विषय: प्रथम पिढीतील उद्योजक ते उद्योग सक्षमकर्त्या - विद्यापीठांमध्ये नवप्रवर्तन, स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना ८. श्री. अंकुशराव कदम, कुलपती, एमजीएम विद्यापीठ ९. प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलगुरू, एमजीएम विद्यापीठ १०.डॉ. आशिष गाडेकर, कुलसचिव, एमजीएम विद्यापीठ

या संवाद सत्राच्या माध्यमातून शैक्षणिक आणि तंत्रज्ञानात्मक विचारांची सांगड घालत नव्या पिढीला प्रेरणादायी दिशा देण्याचा एमजीएम विद्यापीठाचा मानस आहे. या संवाद सत्रास सर्वांना खुला प्रवेश असणार आहे. विद्यार्थी, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, संस्थाचालक, उद्योजक, उद्योग क्षेत्रातील मान्यवर, अभ्यासक व सर्व संबंधितांनी या संवाद सत्रामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# चोला एमएसतर्फे ग्रामीण आरोग्यसेवेसाठी दोन रुग्णवाहिकां भेट

छत्रपती संभाजीनगर, १२ एप्रिल २०२५ : चोलामंडलम एमएस जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (चोला एमएस जनरल इन्शुरन्स) यांनी त्यांच्या कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकीतून, (सीएसआर) उपक्रमाअतर्गत, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दोन अत्याधुनिक अ‍ॅम्ब्युलन्स देण्यात आल्या आहेत. या उपक्रमासाठी इंडियन हेड इंज्युरी फाउंडेशन (आयएचआयएफ) यांच्या सहकार्याने अंमलबजावणी करण्यात आली आहे. जीवनरक्षक उपकरणांनी सज्ज असलेल्या या अ‍ॅम्ब्युलन्स, आपत्कालीन आरोग्य गरजांसाठी रुग्णवाहतूक, तपासणी व ट्रॉमा



केअर सेवा प्रदान करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. या योगदानामुळे विशेषतः ग्रामीण व दुर्लक्षित भागांमध्ये वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीला जलद प्रतिसाद देण्याची जिल्ह्याची क्षमता वाढणार आहे.

या रुग्णवाहिकांचे औपचारिक उद्घाटन संभाजीनगरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, पुणे येथील कृषी संचालक विनय कुमार आवटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि विभागीय सहसंचालक कृषीचा अतिरिक्त कार्यभार असलेले प्रकाश देशमुख, संभाजीनगर येथील जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा परिषद संभाजीनगर येथील मुख्य कार्यकारी अधिकारी. अनिकेत, चोला एमएसचे व्यवस्थापकीय संचालक व्ही. सूर्यनारायणन , मुख्य अनुपालन अधिकारी आणि कंपनी सचिव महेंद्र कुमार त्रिपाठी, आणि पीक विमा विभागाचे प्रमुख शंकरनारायणन केएस आणि इंडियन हेड इंज्युरी फाउंडेशन चे कार्यकारी संचालक कमोडोर रणबीर तलवार, व्हीएसएम (निवृत्त) यांच्या उपस्थितीत करण्यात आले

यावेळी चोला एमएस जनरल इन्शुरन्स आणि इंडियन हेड इंज्युरी फाउंडेशन च्या प्रतिनिधींनी महाराष्ट्र शासनाला या अ‍ॅम्ब्युलन्स औपचारिकरित्या सुपूर्द केल्या. संभाजीनगर परिसरातील रुग्णांच्या वाहतुकीसाठी या अ‍ॅम्ब्युलन्स अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. हा पुढाकार चोला एमएस जनरल इन्शुरन्सच्या सीएसआर तत्वांशी सुसंगत असून, गरजू आणि वंचितांना आरोग्यसेवा देण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

याप्रसंगी बोलताना चोला एमएसचे व्यवस्थापकीय संचालक व्ही. सूर्यनारायणन म्हणाले, चोला एमएसचा कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) कार्यक्रम आमच्या नीतिमत्तेत खोलवर रुजलेला आहे. मुरुगप्पा ग्रुपचा एक भाग म्हणून, समाजाला परतफेड करणे हे आमच्या डीएनएमध्ये आहे. संभाजीनगर आणि आसपासच्या रुग्णांना, विशेषतः वंचितांना वेळेवर वैद्यकीय मदत देण्यात या रुग्णवाहिका महत्त्वाची भूमिका बजावतील. हा उपक्रम चोला एमएसच्या आरोग्यसेवेच्या प्रवेशात सुधारणा करण्याच्या समर्पणाला आणि समाजात अर्थपूर्ण योगदानाद्वारे समावेशक विकासाच्या व्यापक दृष्टिकोनाला अधोरेखित करतो.

## अष्टांग योग मार्ग फाउंडेशनच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) अष्टांग योग मार्ग फाउंडेशनच्या, वतीने भारतरत्न डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ जयंती निमित्त डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले प्रारंभी योग गुरु रवी रत्नपारखे यांनी बाबासाहेबांना प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले याप्रसंगी बोलताना श्री रत्नपारखे म्हणाले बाबासाहेबांनी मनुवादाच्या गुलामगिरीतुन मुक्त करून , स्त्री-पुरुष समानतेचा , स्त्रियांनाही संपत्ती मध्ये वाटा असण्याचा , शिक्षणाचा तसेच , भारतात जन्मलेल्या सामान्य (बहुजनांना ) माणसाला मानुस म्हणुन जगता यावे , त्याला न्यायचा , शिक्षणाचा , संपत्तीचा , आरोग्याचा , योग साधना, बोलण्याचा , विचार मांडण्याचा ,लोकशाही मध्ये मताचा अधिकार , नोकरी मध्ये कामाच्या ८ तासांचा वेळ , पीफ मिळण्याचा अधिकार मिळण्याकरीता संविधानामध्ये तरतुद करुन , संविधानाचा निर्मीतीकार , रिजर्व बँकेची निर्मीतीकार , जागतिक अर्थ तज्ञ्ण्य , साहित्यीक , पुस्तकासाठी घर बांधणारे , आमचे सर्व भारतीयांचे प्रेरणास्थान असल्याचे ते म्हणाले यावेळी डॉ संपत सारडा सलीम काझी किसन नरोडे पाटील डॉ सुधाकर नरवाडे उमराव गायकवाड दिनेश शिरसाट मैपाल मून रमेश सातदिवे सिद्धार्थ शेजुळव देवानंद साबळे रामलाल सिंग राजपूत बाबासाहेब मस्के भाऊसाहेब

सुखधान रमेश वाघ माधु भिसे चंद्रकांत खिल्लारे कचरू सोनवणे प्रकाश पगारे दामू अण्णा डोंगरे सुखाचं लंके पाटील पुनम राठोड दत्ता भोसले उत्तम चव्हाण रफिक पठाण यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते

# भगवान महावीर जन्म कल्याणक महिला सांस्कृतिक समिती स्पर्धांचे बक्षीस वितरण

भगवान महावीर जन्म कल्याणक रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त महिला सांस्कृतिक समिती अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा, नृत्य, नाटिका यांचे बक्षीस वितरण तापडिया नाट्य मंदिर येथे नुकतेच करण्यात आले.

यावेळीआठ नृत्य तर तेरा नाटिका तसेच विविध स्पर्धातील यशस्वी कलाकार, स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देण्यात आले. सौ.आशुजी दर्डा, सौ. शितल दर्डा, सौ.रुचिरा दर्डा बक्षीसाचे प्रायोजक होते.

आर.सी बाफना, फुलचंद जैन (रवी मसाला) यांच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला.



सूत्रसंचालन सविता लोढा, रूपाली रावका यांनी केले.

प्रारंभी स्पर्धेचे उदघाटन महासचिव महावीर पाटणी, झुंबरलाल पगारिया,मिठालाल कांकरिया, विलास साहूजी, स्वप्निल पारख, प्रतीक साहूजी, निलेश जैन, पंकज साकला, प्रमोद पाटणी, बाहुबली वायकोस, अनिल संचेती, कौशिक सुराणा,दिगंबर क्षीरसागर, राजेश मुथा, विनोद बोकाडिया, मदनलाल अच्छा, तसेच महिला समितीतर्फे भारती बागरेचा संगीता संचेती, सारिका साहूजी, ललिता साकला मनीषा भन्साळी, सविता लोढा, भावना सेठिया, तनुजा गांधी, करुणा साहूजी, मेघा सुगंधी, नीता गादिया, विद्या म्हेत्रे, कविता अजमेरा, मधु जैन, आशाकासलीवाल, पल्लवी शहा, मीना पापडीवाल मंजू पाटणी, साधना शहा आदींसह स्पर्धक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## डॉ. आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. वि. ल. धारूरकर यांचे प्रतिपादन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. त्यांचे आर्थिक विचार आधुनिक भारतापुढील प्रश्न सोडविण्यासाठी आजही उपयुक्त आहेत. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे डॉ. आंबेडकरांनी शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, ऊर्जा अशा सर्व बाजूंनी भारतापुढील समस्यांचा वेध घेत विविध क्षेत्रात नवभारताच्या उभारणीसाठी दिशादर्शन घडविले. त्यांच्या प्रगत विचारातून आधुनिक भारताची जडणघडण झाली, असे विचार प्रसिद्ध विचारवंत व माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर यांनी व्यक्त केले. नारायणराव उजळंबकर वाचनालयात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भारतीय मजदूर संघाचे माजी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दौलतराव मस्के होते.

डॉ. धारूरकर म्हणाले, डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रामध्ये कोलंबिया विद्यापीठात आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे केलेले संशोधन हे नवभारतापुढील समस्यांची गुंतागुंत सोडविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरले. त्यांनी भारताचे पहिले कायदामंत्री या नात्याने महिलांच्या हक्कांचा विचार केला तसेच ऊर्जा समस्या, सिंचन समस्या या प्रश्नांचाही सखोल विचार करून त्यावर त्यांनी उपाय सुचविले. त्यांच्या विचाराची दूरदृष्टी एवढी होती की, आधुनिक भारताची जडणघडण करण्यासाठी त्यांनी मांडलेले विचार वर्तमान काळातही तेवढेच महत्त्वाचे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या दशकाच्या कारकीर्दीत प्रामुख्याने डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या मार्गाने नवभारताची उभारणी करण्याचा प्रयत्न केला आहे. २०४७ मध्ये विकसित भारत साध्य करावयाचा असेल तर आपणास आंबेडकरांच्या शाश्वत विकास संकल्पना प्रत्यक्षात कृतीमध्ये आणाव्या लागतील, असेही सूत्र त्यांनी मांडले. डॉ. आंबेडकर यांच्या जीवनाविषयी प्रकाश टाकताना धारूरकर म्हणाले की, त्यांनी आपल्या जीवनात त्रिमिती संघर्ष केला.


दि.१७/०४/२०२५

## जाहीर प्रगटन

**(मौजे गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथिल शेतजमीन गट नं. २७ मधील ० हे. २० आर क्षेत्र)**

माझे पक्षकार श्री. रूषिकेश एकनाथ जाधव रा. समर्थनगर, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मौजे गंगापूर ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर येथिल शेत जमीन गट नं. २७ एकुण क्षेत्र १० हे. ७८ आर अधिक पोटखराबा क्षेत्र ६८ आर या जमीनीपैकी श्री. कय्युम कादर भडंगे रा. मन्सुरी कॉलनी, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर व श्री. फिरोज हारून भडंगे रा. कायगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर यांच्या सामाईक मालकी व ताब्यातील एकूण क्षेत्र ० हे. ४० आर या जमीनीपैकी २० आर जमीन ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचा करार केला असून सदर जमीनीच्या चर्तुः सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस विरसिंग फकिरचंद राजपूत व निर्मलाबाई विरसिंग राजपुत यांची जमीन, पश्चिमेस, बोलेगांव-गंगापूर रस्ता, दक्षिणेस कय्युम कादर भडंगे व फिरोज हारून भडंगे यांची उर्वरित जमीन आणि उत्तरेस सविता विलास दहाडे यांची जमीन.

असे की, श्री. कय्युम कादर भडंगे व श्री. फिरोज हारून भडंगे यांनी सदरील जमीनी दोषमुक्त व निर्विवाद असल्याची खात्री माझ्या पक्षकाराला दिली आहे. तरी देखील या जाहीर प्रगटाद्वारे तमान जनतेस कळविण्यात येते की, सदर वरील जमीनींशी कोणाचा काही एक हक्क संबंध, चोळी बांगळी गहाण, दान, बक्षिस, खरेदी-विकी अथवा इतर कुठल्याही मार्गाने हक्क संबंध असल्यास त्यांनी प्रस्तूतचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कागदपत्रांच्या पुराव्यासह आमच्या नमूद पत्त्यावर आक्षेप नोंदवावा, मूदती आक्षेप न आल्यास माझे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. करीता हे जाहीर प्रगटण आज दि.१७/०४/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आले.

जाहिर प्रगटन देणार तर्फे
ॲड. दत्ता एकनाथराव पानकडे
मो.नं. ९५९५६६६६२२

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३२३/२०२५
परिगाबाई विश्वनाथ जाधव व इतर
विरुध्द
निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे पिता नामे विश्वनाथ गोविंदराव जाधव, रा. दिवशी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांचा मृत्यु दि.१४/१०/२०२४ रोजी मौजे दिवशी पिंपळगाव, ता. गंगापुर येथे झालेला आहे. अर्जदार नं. १) परिगाबाई विश्वनाथ जाधव, रा. दिवशी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) भिमाबाई भानुदास थोरात, रा. दिवशी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) चंद्रकलाबाई भ्र. मधुकर बोरसे, रा.शिरोडी/औराळा, ता. जि.औरंगाबाद ४) रुख्मनबाई भ्र. नारायण गुंड, रा.शिरोडी/औराळा, ता.जि. औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.१७/०४/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहिर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १६३/२०२५.

अर्जदार : १. शामराव शेनफड जाधव, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. गलवाडा (सो) ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. धनराज शेनफड जाधव, वय ४५ वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे, ३. शोभाबाई श्रिपत गवळे, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. हळदा, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर, ४. सरलाबाई कोंडीराम बावस्कर, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. वसई, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर.

विरुद्ध
निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भागाबाई शेनफड जाधव यांचा दिनांक १७/०८/२०२४ रोजी गलवाडा सो येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत भागाबाई शेनफड जाधव यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १३/०६/२०२५

आदेशावरुन
विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १६४/२०२५.

अर्जदार : १. शरीफा बंडु तडवी, वय ५० वर्षे, धंदा मजुरी, रा. रवळा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. अजय बंडु तडवी, वय २४ वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे. ३. सपना बंडु तडवी, वय २३ वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे, ४. आकाश बंडु तडवी, वय २० वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध
निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत बंडु समशेर तडवी यांचा दिनांक ३०/०७/२०१६ रोजी रवळा येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत बंडु समशेर तडवी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात

आजरोजी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १२/०६/२०२५

आदेशावरुन
विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद,**

किरकोळ दिवाणी अर्ज क. १६६/२०२५

अर्जदार : १. श्री. अंकुश स्वरुपचंद राठोड, वय-५३ वर्षे धंदा शेती, (मुलगा), २. श्री. रविंद्र स्वरुपचंद राठोड, यय-४३ वर्षे, भंदा क. १ व २ रा. वरखेडी बु., ता. सोयगांव, जि. शेती, (मुलगा) औरंगाबाद. ३. श्री. वंदना कैलास चव्हाण, वय ५६ वर्षे, भंदा घरकाम, (मुलगी) क. ३ रा. बलेखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद,

विरुध्द

गैरअर्जदारः कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत,

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने बारम प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डी. आर. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत स्वरुपचंद जगराम राठोड हे दि. २३/०२/२०२५ व कस्तुराबाई स्वरुपचंद राठोड हया दि. १६/०८/२०१७ रोजी वरखेडी बु.. ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. वरील सर्व अर्जदार हे मयत स्वरुपचंद जगराम राठोड व कस्तुराबाई स्वरुपचंद राठोड यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र टेण्यात येईल. पुढील तारीख १३/०६/२०२५.

आज दि. १६/०४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन
विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव




## 'आतली बातमी फुटली' चित्रपटातून मोहन आगाशे आणि रोहिणी हट्टंगडी पहिल्यांदा एकत्र

आजपर्यंत दोन दिग्गज कलाकार एकाच चित्रपटात काम करणे काही नवीन नाही; पण मराठीत असा सुवर्णयोग फार क्वचितच पाहायला मिळतो. 'आतली बातमी फुटली' या सिनेमाच्या निमित्तानं ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे आणि ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी मराठी सिनेमात पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत. या दोघांनी अभिनयाच्या जोरावर मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही आपला वेगळा ठसा उमटवला आहे. अशा दोन कलासंपन्न कलाकारांना एकत्र पडद्यावर पाहणं प्रेक्षकांसाठी पर्वणी असेल. विशाल पी.गांधी आणि जैनेश इजरदार यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. येत्या ६ जूनला 'आतली बातमी फुटली' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या दोन दिग्गजांची चित्रपटात एकत्र येण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्यामुळे या दोघांच्या अभिनयाची वेगळी केमिस्ट्री रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. सामान्य माणसाच्या माध्यमातून लेखक-दिग्दर्शकांनी वर्तमानातील कटू सत्य पडद्यावर सादर केलं आहे.

# पोलीसांनी पकडले अवैध जनावरांचे मांस

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१७ मार्च - कन्नड ग्रामीण पोलिसांनी कत्तलीस बंदी घातलेल्या जनावरांच्या मांसाची वाहतूक करणाऱ्या स्कार्पिओ चार चाकी वाहनावर कारवाई करत सुमारे ३०० किलो अवैध मांस जप्त केले आहे. पोलिसांना मिळालेल्या माहीतीवरून गुरुवारी (दि.१७) सकाळी पावने अकरा वाजेच्या सुमारास कन्नड कडून छत्रपती संभाजीनगरकडे येणाऱ्या (एमएच ०४ ई एक्स ८९३२) स्कार्पिओ गाडीची हतनूर टोलनाका येथे उपविभागिय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड,, पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हतनूर बीट जमादार कैलास करवंदे, पोलीस हवालदार



शिवदास बोराडे, पोलिस नाईक रवींद्र ठाकूर व पशु अधिकारी डॉ.विजय थोरात, पोलीस पाटील प्रकाश पवार, पोलीस मित्र संतोष ढोले यांच्या पथकाने सदर गाडीची तपासणी केली असता गाडी मध्ये ४८ हजार रुपये किमतीचे ३०० किलो अवैध जनावरांचे मांस आढळून आले. या प्रकरणी स्कार्पिओ गाडीसह २ लाख ४८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून नवीदखान एजाजखान (वय२८) रा. रहेमानिया कॉलनी आझाद चौक छत्रपती संभाजीनगर व जावेद आयुब कुरेशी (वय३५) रा. सिल्लेखाना, छत्रपती संभाजीनगर या आरोपींना ताब्यात घेतले आहे. बीट जमादार कैलास करवंदे यांच्या फिर्यादी वरून कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शना खाली पोलिस हवालदार शिवदास बोराडे करत आहे.

# जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा निमित्य स्वच्छता अभियान


तभा वृत्तसेवा

पैठण दि :- महाराष्ट्र शासनाच्या वतीने संपूर्ण राज्यात जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा राबविण्यात येत असून या अंतर्गत नाथसागर जलाशयावर मराठवाडा गोदावरी खोरे विकास महामंडळ कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार,कडाचे प्रशासक समाधान सबनीसवार,उप प्रशासक दीपक डोंगरे, नंदकिशोर ढाकणे, निळकंठ पवार, जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



यावेळी दगडी धरण उपविभागीय अभियंता श्रध्दा निंबाळकर, धरण अभियंता विजय काकडे, अभियंता रितेश भोजने,अभियंता गणेश खराडकर,अभियंता अब्दुल बारी गझी, आप्पासाहेब तुजारे, शेषेराव अडसूळ यांच्यासह गार्डन वरीयर्स ग्रुपचे सदस्य ममताराम कारे, डॉ पवन बदाजते, डॉ संदीप आनंतरकर,अँड नरेश माणधने, भास्कर वाघ,ज्ञानेश्वर जाधव,, बाळू गव्हाणे, बद्रीनाथ घटे,सचिन पांडव,बापू मापारी, अमोल जाधव, गणेश शिंदे, नंदलाल शेळके आदीसह ईतर सदस्य उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (९३) वनवासी

श्री गुरुजी म्हणत वनवासी, गिरीजन गरीकुहारामध्ये- पहाडामध्ये दयनीय जीवन जगत आहेत. त्यांना सरकार व मिशनरी आदिवासी संबोधतात. परंतु आदिवासी हा शब्द कपट पूर्ण, भ्रामक आणि विच्छेदक वाटतो. त्यातून गुलामी प्रगट होते. गेली दीड दोन शतके इतर धर्मीय प्रचंड कारस्थाने करून त्यांचे धर्मांतरण करतात. अशा वनवासींना अज्ञान अंधःकारातूत प्रकाशाच्या वाटेवर आणण्यासाठी काय करता येईल, असा प्रश्न ते कार्यकर्त्यांना विचारत. आणि मग वनवासी जीवनाचे पुनरुज्जीवन करणारी संघाची प्रथम व्यक्ती उभी राहिली त्यांचे नाव श्री बाळासाहेब देशपांडे. त्यांनी १९५२ मध्ये मध्यप्रदेशातील जशपूरच्या महाराजांच्या सक्रिय सहयोगाने वनवासी कल्याण आश्रमाची स्थापना केली. तेव्हा श्री गुरुजी- जसपूरचे महाराज व तब्बल दहा हजार वनवासींच्या उपस्थितीत तिथे कार्याचा श्रीगणेशा छात्रावास व प्राथमिक शाळा काढून केला, आधी तिथे असलेल्या हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार केला. हीच प्रथा पुढे श्री बाळासाहेब देवरस यांनी पण सुरु ठेवली. वनवासी संत गहिरा गुरुजींचा आशीर्वाद व सहयोग मिळवला. असे अनेक वनवासी संत श्री बाळासाहेब यांच्या हाकेला ओ देऊ लागले मग इथे विश्व हिंदू परिषदेने पण पहिला उपक्रम हाती

घेतला त्यांनी ॐचेकंठहार अनेकवनवासींच्यागळ्यातघातले.

आधीत्यांच्यागळ्यातक्रॉसचाकंठहारदिसायचा. त्यानंतरइथेयज्ञ- योग- रामचरितमानसकथन-रामनवमीयात्रा-वअनेकधार्मिककार्यक्रमकेले. साधूसंतांचीप्रवचनेकेली.

आसपासच्यावनवासींचेभजनसंघबनवले. महिला- बालक- युवा सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमामुळे संघाकडे आकृष्ट झाला. सामूहिक सहभोजने- रक्षाबंधन हळदीकुंकू आदोन कार्यक्रमात सर्वांचा सहभाग वाढू लागला. १९७८ ला प्रधानमंत्री मोरारजी देसाईंनी भेट दिली तेव्हा हे बहुमुखी परिवर्तन पाहून सुखद आश्चर्य आनंदाने प्रगट केले. ते म्हणाले आपने तो इसाई मिशनरीयो को बहुत पीछे छोडा है।। (बाकी पुढील अलक मध्ये) क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १४९/२०२५

अर्जदार : १/- लताबाई श्रावण बोरसे, वय ५३ वर्ष, धंदा शेती, रा. गोंदेगाव, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद. २/- विजय श्रावण बोरसे, वय ३२ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- मनोज श्रावण बोरसे, वय २६ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

कुणीही नाही

प्रकरण वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

मर्व संबंधिताम जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. सचिन सुनील गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत श्रावण बळीराम बोरसे यांचा दि. १९.०९.२०२४ रोजी मौजे गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मयत झालेले असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी मयत श्रावण बळीराम बोरसे याचे वाग्य अगुन त्याना मयत श्रावण बळीराम बोरसे याचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वाग्य प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या बारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यानी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार याना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. १६/४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. १२/०६/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १५०/२०२५.

अर्जदार : १. बळीराम दयाराम सुरडकर, वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. गलवाडा (सो) ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. नंदाबाई भारत जोहरे, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दयाराम कडुबा सुरडकर यांचा दिनांक ३१/०५/२०१९ रोजी गलवाडा सो येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते २ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत दयाराम कडुबा सुरडकर यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १२/०६/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर,**

दि.कि.अर्ज क.३२४/२०२५

अर्जदार :- १. शादाब अहमद पि. जमील अहमद शेख, रा. आसेगाव, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर २. नजमुनिसा भ्र. जमील अहमद शेख, रा. प्लॉट क. १२. रूम नं. १७८२, भारतनगर, बी के सी, व्ही टी सी, बांद्रा पूर्व, मुंबई, ३. कौसर बेगम पि. जमील अहमद शेख, रा. सदर, ४. जाकिर अहमद पि. जमील अहमद शेख, रा. सदर, ५. निलोफर पि. जमील अहमद शेख, रा. सदर.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ अॅड. एस.के.नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. २ ही अर्जदार क. १, ३ ते ५ यांची आई असुन अर्जदार क. २ चे पती म्हणजेच ईतर अर्जदारांचे वडील नामे जमील अहमद पि. अमिर शेख हे दिनांक १९/०२/२०२२ रोजी मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयताचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक १५/०४/२०२५ रोजी दिले.

आदेशानुसार

सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. २९९/२०२५

अर्जदार : १) ताराबाई शिवलाल बडोगे, वय ६२ वर्षे, धंदा शेती रा. टाकळी कदीम ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) नंदलाल शिवलाल वडोगे, वय ३७ वर्षे, धंदा शेती रा. टाकळी कदीम ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) कृष्णा शिवलाल वडोगे, वय ३५ वर्षे, धंदा शेती रा. टाकळी कदीम ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सौ. सविता विजय कुकलारे वय ४१ वर्षे धंदा घरकाम रा. शिरेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण - हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. वाय एन जाधव यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्यानं सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे शिवलाल वाल्मिक बडोगे हे मौजे टाकळी कदीम ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २८/०१/२०२४ रोजी मौजे टाकळी कदीम ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत शिवलाल वाल्मिक वडोगे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारस असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्‌तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०२/०५/२०२५ रोजीची आहे.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १६/०४/२०२५ दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय गंगापुर सहायक अधोक्षक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ. अर्ज.क्रं. १८८/२०२५.

पुढील तारीख २४/०४/२०२५

अर्जदार : १. सपना सागर ठाकरे, वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. नरसिंगपूर कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २. रोहीत सागर ठाकरे, वय ११ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा. क. अर्जदार क्र. १ आई ३. ऋषीकेश सागर ठाकरे, वय ११ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा. क. अर्जदार क्र. १ आई ४. कृष्णा सागर ठाकरे, वय ९ वर्षे, धंदा शिक्षण, अ. पा. क. अर्जदार क्र. १ आई. ५. मोहन कुशीनाथ ठाकरे, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. नरसिंगपुर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ६. सरुबाई भ्र. मोहन ठाकरे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. नरसिंगपूर कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, द्वारा जिल्हाधिकारी, औरंगाबाद

अर्ज :-वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. व्ही. बी. काळे यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ६ हे वरील ठिकाणचे कायम रहिवासी आहेत. अर्जदार क्र १ चे पती व अर्जदार क्र २ ते ४ चे वडील व अर्जदार क्र. ५ व ६ यांचा मुलगा नामे सागर मोहन ठाकरे हा होता तो दिनांक ०१.०१. २०२३ रोजी मौजे नरसिंगपूर कन्नड, ता. कन्नड येथे आजारपणात मयत झाला आहे. मयत सागर मोहन ठाकरे चे मृत्यू पश्चात वारस अर्जदार क्र १ पत्नी, अर्जदार क्र. २ ते ४ हे अज्ञान मुले व अर्जदार क्र. ५ व ६ है वडील व आई हेच कायदेशीर वारस असून अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. मयत सागर ठाकरे हे हयात असतांना ग्रामपंचायत नरसिंगपूर कन्नड, ता. कन्नड येथे शिपाई या पदावर नोकरीस होते व सेवेत असतांनाच मयत झालेले आहे. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय विविध योजनेचा लाभ मिळण्यासाठी व ग्रामपंचायत व इतर कार्यालयात वारसाची नोंद घेण्यासाठी तसेच मयताचे पश्चात मिळणारे पगार, पेंशन व इतर लाभ मिळण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे व तसे वारस प्रमाणपत्र आणण्याबाबत संबंधीत अधिकारी यांनी सांगितले करिता अर्जास कारण घडले आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १५/०४/२०२५.

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी साहेब दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र. १३७/२०२५

पुढील तारीख- २५/०३/२०२५ २९/०४/२०२०

अर्जदार : १. चंद्रकला नामदेव जाधव, वय ६३, धंदा- घरकाम, रा. गव्हाली तांडा, ता.कन्नड जि. औरंगाबाद. २. किशोर नामदेव जाधव, वय ४२, धंदा- नोकरी, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. संदीप नामदेव जाधव, वय ३५, धंदा-शेती, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. प्रदीप नामदेव जाधव, वय ३४, धंदा शेती, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड जि.औरंगाबाद. ५. वैशाली शिवाजी चव्हाण, वय ३७, धंदा-घरकाम, रा. स्वामी पार्क, स्नेह नगर दिंडोरी, ता. जि. नाशिक. ६. सुनिता कृष्णा चव्हाण, वय ३६, धंदा घरकाम, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ७. सुरेखा दादाभाऊ राठोड, वय ३२, धंदा घरकाम, रा. लोह शिंगवे, ता.जि. नाशिक.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छ.संभाजीनगर.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अँड. डी. एन. चव्हाण यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सदर केला कि, हे की, अर्जदार क्र. १ ही मयत नामदेव मांगू जाधव यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ४ हे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र. ५ ते ७ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. मयत नामदेव मांगू जाधव यांना अर्जदार क्र. १ ते ७ हे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ७ यांचे वडील नामे नामदेव मांगू जाधव हे दि.०५/०७/२०२१ रोजी शासकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथे कोरोना या आजारामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ७यांना मयत नामदेव मांगू जाधव यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. हे की, मयत नामदेव मांगू जाधव हे शासकीय महविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथे कोरोना या आजारामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ७ हे कायदेशीर वारस असून त्यांना वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.१५/०१/२०२५ रोजी मौजे गव्हाली तांडा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी या जाहीर प्रकटनाद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते कि, सदरील प्रकरणाबाबत कोणताही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापसून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप दाखल करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

दि. १५/०४/२०२५

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## जाहार प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. एन. काटकर, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कनड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: १४१/२०२५

पुढील तारीख : २५/०४/२०२५

अर्जदार : १- श्रीमती सुनिता भ्र. विनायक राठोड वय ४४ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. वडणेर तांडा, ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद २- सौ. सोनीया भ्र. ज्ञानेश्वर चव्हाण, वय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपरखेडा ता. नांदगांव, जिल्हा नाशिक ३-रोहीत विनायक राठोड, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ४- कु. निकीता विनायक राठोड, वय १७ वर्षे ०८ महिणे, धंदा शिक्षण, अ.पा. क. सुनिता विनायक राठोड, जन्मदाती आई अर्जदार क्रं. १, ५-छबीबाई भ्र. जयसिंग राठोड, वय ७८ वर्षे, धंदा काहीनाही, रा. वडणेर तांडा ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद

- विरुध्द

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी औरंगाबाद

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील अॅड. एस. एम. शिरसे, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायम रहिवाशी असून त्यांनी मे. न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे, अर्जदार क्रमांक १ चे पती व अर्जदार क्रमांक २ ते ४ यांचे वडील तसेच अर्जदार क्रमांक ५ चा मुलगा नामे विनायक जयसिंग राठोड हा होता तो दिनांक १६.९.२०२४ रोजी मौजे वडणेर तांडा ता. कन्नड येथे आजारपणामुळे मयत झाला आहे, अर्जा सोबत ग्राम पंचायत वडणेर ता. कन्नड चा मृत्युचा दाखला अर्जदारांनी या न्यायालयात दाखल केला आहे, मयतास मृत्यु पश्चात अर्जदार क्रमांक १ पत्नी, अर्जदार क्रमांक २ व ४ मुली, अर्जदार क्रमांक ३ हा मुलगा व अर्जदार क्रमांक ५ ही मयताची आई आहे, मयत विनायक राठोड यांस अर्जदार क्रमांक १ ते ५ शिवाय ईतर कोणीही वकायदेशीर वारस नसून अर्जदार हेच एकमेव वारस आहे. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार सोबत स्वतः चे आधार कार्ड विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक ०४.०४.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : ०४.०४.२०२५

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.व्हि.डी.पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज कं.२२२/२०२५

पुता ०९/०५/२०२५

अर्जदार : १) भारजाबाई काशिनाथ जाधव वय-८४ वर्षे धंदा-घरकाम रा.उपळा ता. कन्नड जि. औरंगाबाद. २) कैलास काशिनाथ जाधव वय-४५ वर्षे धंदा-मजुरी रा.स्नेह नगर कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३) आश्विनी भिमराज सातदिवे वय-४९ वर्षे धंदा-घरकाम रा.साई कॉ. ऑपरेटीव सोसायटी (पुर्व) उल्हास मोटार टेनिंग स्कुल ता.जि.ठाणे

विरूध्द

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन व्दारा जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज - कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकिल अॅड. आर.बी.सातदिवे यांचे मार्फत मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार कं. १ चे पती व अर्जदार क. २ ते ३ यांचे मयत वडील नामे काशिनाथ धोंडीबा जाधव हे होते ते उपळा येथील रहिवाशी होते ते दिनांक २५/०४/१९९० रोजी मयत झाले आहे त्यांना अर्जदार कं. १ पत्नी व अर्जदार कं. २ मुलगा व अर्जदार कं. ३ मुलगी असून त्यांना अर्जदार कं. १ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. मयत काशिनाथ धोंडीबा जाधव यांचे वारस प्रमाणपत्र अर्जदार कं. १ व ३ यांना शासमिय निमशासकिय कार्यालयात विविध योजनाचा लाभ घेण्याकरिता अर्जदाराच्या वडिलांच्या नामे काशिनाथ धोंडीबा जाधव यांचे अर्जदार कं १ व ३ हे यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असून तसे सबंधीत कार्यालयाने वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे करिता अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबात कोणासही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार यांचे हक्कात अर्जदार कं. १ ते ३ हे मयत काशिनाथ धोंडीबा जाधपव यांचे वारस असल्याचे अर्जदार कं. १ व ३ यांना वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक - ०९/०४/२०२५

आदेशावरून

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ८९/२०२५

पुढील तारीख १०/०६/२०२५

अर्जदार : १. जालमसिंग भावलाल मांदड, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. गणेशपुरवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २. संजय भावलाल मांदड, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. गणेशपुरवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३. कचरु भावलाल मांदड (मयत) ३.१ राधाबाई कचरु मांदड, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. गणेशपुरवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३.२ गणेश कचरु मांदड, वय ३ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्र. ३-१ आई ३.३ मंगल कचरु मांदड, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. गणेशपुरवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४. छायाबाई विजयसिंग भाट, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कळस, ता. पुणे जि. पुणे,

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. व्ही. बी. काळे यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ते ४ आपसात सख्खे भाऊ आहे तसेच अर्जदार क्र. ३ हा मवत असुन अर्जदार क्र. ३१ ही त्यांची पत्नी असुन अर्जदार क्र. ३-२ व ३-३ हे त्यांचे वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र. ३-१ चे सासरे व अर्जदार क्र. ३-२ ते ३-३ यांचे आजोबा नामे भावलाल रामलाल मांदड हे होते ते दिनांक २२/०९/२००५ रोजी मौजे गणेशपुरवाडी ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आई व अर्जदार क्र. ३-१ चे सासु व अर्जदार क्र. ३-२ ते ३-३ च्या आजी नामे यशोदाबाई भावलाल मांदड या देखील दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मयत झालेल्या आहे, तसेच अर्जदार क्र. १ व २ व ४ यांचा भाऊ म्हणजेच अर्जदार क्र. ३ कचरु भावलाल मांदड हा देखील दिनांक २८/०३/२०२४ रोजी मयत झालेला आहे त्यांचे अर्जदार क्र. ३-१ ते ३-३ हे वारस आहे. अर्जदार यांना मयत यशोदाबाई भावलाल मांदड यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच, विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :-१५/०४/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा अधिक्षक

दिवाणी न्यायधीश क. स्तर कन्नड

## अग्रलेख...

# काँग्रेस नेत्यांची न्यायासाठी याचना

“बुडत्याचे पाय खोलात'' अशी आपल्याकडे म्हण आहे. अगदी तसाच प्रकार काँग्रेसच्या बाबतीत घडताना दिसत आहे. हा पक्ष दिवसेंदिवस भ्रटाचाराच्या डोहात बुडत चालला आहे. ज्या काँग्रेस अध्यक्षांच्या एका आवाजात देश थांबविण्याची ताकद होती, ज्याच्या एका आवाजाने देश जागा होत असे, स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात आहुती देण्यासाठी पुढे येत असे, त्या पक्षाचे धुरीण आज न्यायासाठी याचना करताना दिसत आहेत. आपले निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी वकिलांच्या घराच्या चपला झिजवण्याची पाळी त्यांच्यावर आलेली दिसत आहे. देशात गाजलेल्या नॅशनल हेरॉल्ड आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी (मनी लॉण्ड्रिंग) अंमलबजावणी संचालनालयाने काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच ओव्हरसिज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांच्यासह काही जणांविरुद्ध दिल्लीच्या साऊथ एव्हेन्यू न्यायालयात आरोपपत्र दाखल केल्याने काँग्रेसमध्ये संतापाची लाट उसळली आहे. बेकायदेशीर पीएमएल कायद्याच्या कलम ४४ आणि ४५ नुसार या सर्वांवर आरोपत्र दाखल झाले असून, पुढील सुनावणीपूर्वी सर्व कागदपत्रे न्यायालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. काँग्रेस पक्षाने याविरुद्ध आवाज उठवला असून, देशात ठिकाठिकाणी अंमलबजावणी संचालनालयाच्या कारवाईच्या निषेधार्थ निदर्शने केली जात आहेत. पण या आंदोलनामुळे काँग्रेस नेत्यांवर होत असलेल्या आरोपातून त्यांची सुटका थोडीच होऊ शकते? त्यांना चौकशीला सामोरे जावेच लागणार असून, हा ससेमिरा त्यांच्यामागे निर्दोषत्व सिद्ध होईपर्यंत लागलेलाच राहणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची कारकीर्द सुरू केल्यानंतर देशाला संबोधित करताना सांगितले होते की, या नव्या टर्ममध्ये मी अधिक कठोर वागणार आहे. भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगाची हवा खायला लावणार आहे. खरे तर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या लोकांनी, संघटनांनी, राजकीय पक्षांनी पुढाकार घेतला, आंदोलने केली, अंगावर लाठ्या झेलल्या, प्रसंगी तुरुंगवास भोगला, त्यात अग्रक्रमाने काँग्रेस पक्षाचे नाव घेतले जाते. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर याच काँग्रेसने ५५ वर्षे गांधी घराण्यातील नेत्यांच्या पुढाकारात या देशाचे राज्यशकट हाकले. त्या काँग्रेसची आजची झालेली अधोगती देशाचे राजकारण कुठल्या दिशेने गेले हे दर्शवीत आहे. काँग्रेसच्या कार्यकाळात देशात अनेक मोठे घोटाळे झाले. तथापि यातील एकाही घोटाळ्यात गांधी कुटुंबातील व्यक्तीचे नाव आजवर आलेले नव्हते. नॅशनल हेरॉल्ड हे पहिलेच प्रकरण असे आहे, ज्यात गांधी कुटुंबातील सदस्यांची चौकशी झाली, त्यांच्या मालमत्तांवर टांच आली आणि आज त्यांच्याविरुद्ध आरोपपत्रही दाखल झाले. त्यामुळेच हे प्रकरण देशात अधिक चवीने चघळले जात आहे.

आज जी परिस्थिती काँग्रेसच्या पुढाऱ्यांवर आली आहे, त्यासाठी कारणीभूत ठरली सुब्रमण्यम् स्वामी यांची एक याचिका. काँग्रेसने नॅशनल हेरॉल्डच्या माध्यमातून मोठा घोटाळा केल्याची तक्रार त्यांनी २०१२ मध्ये न्यायालयात एका याचिकेद्वारे केली होती. काही काँग्रेस नेत्यांनी चुकीच्या पद्धतीने यंग इंडियन लिमिटेडच्या माध्यमातून असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडची संपत्ती अधिग्रहित केल्याचा आरोप डॉ. स्वामी यांनी याचिकेत केला होता. दिल्लीतील बहादूरशहा जफर मार्गावरील असोसिएटेड जर्नल्सच्या अखत्यारीतील नॅशनल हेरॉल्डची २००० कोटी रुपयांची संपत्ती काँग्रेस नेत्यांनी पाच लाख रुपयांत हडपली होती. २०२१ मध्ये ईडीने या प्रकरणी चौकशी सुरू केली. ज्या वृत्तपत्राच्या आधारे देशात जनजागर करून भ्रष्टाचाऱ्यांची गाळण उडवायची, गरिबांना, शोषितांना आणि मागासांना न्याय मिळवून द्यायचा, त्याच वर्तमानपत्राद्वारे कोट्यवधींचा घोटाळा करून गांधी कुटुंबातील सदस्य मजा मारायला निघाल्याने त्यांच्या प्रामाणिकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता हे जाणून घ्यायला हवे की, नॅशनल हेरॉल्ड हे प्रकरण आहे करी काय? भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांनी, जवाहरलाल नेहरूंनी आणि इतर समकालीन नेत्यांनी १९३८ मध्ये पक्षाच्या ध्येय-धोरणांच्या प्रचार-प्रसारासाठी नॅशनल हेरॉल्ड हे वृत्तपत्र सुरू केले. या प्रकाशन संस्थेने यासोबतच कौमी आवाज हे ऊर्दू आणि जवजीन हे हिंदी भाषेतील वर्तमानपत्रही सुरू केले. स्वातंत्र्यसंग्रामात या वृत्तपत्राचे कार्य मोलाचे होते. या वृत्तपत्रातून स्वातंत्र्य सैनिकांचा आवाज नागरिकांपर्यंत पोहोचत असे. काँग्रेसची उदारमतवादी ध्येयधोरणे लोकांपर्यंत पोहोचत असत. प्रारंभी पं. जवाहरलाल नेहरू या वृत्तपत्रात संपादकीय लिहायचे आणि ब्रिटिशांवर जोरदार टीका करीत होते. इंग्रजांना हे वृत्तपत्र खटकत होते. १९४२ मध्ये या वृत्तपत्रावर बंदी आणली गेली. १९४५ साली हे वृत्तपत्र पुन्हा सुरू करण्यात आले. १९४७ला देश स्वतंत्र झाल्यानंतर नेहरू देशाचे पंतप्रधान झाले. पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर त्यांनी वृत्तपत्राच्या संस्थेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. मात्र, त्यानंतरही वृत्तपत्राचे प्रकाशन सुरूच राहिले. काँग्रेसचे मुखपत्र असेही या वृत्तपत्राला संबोधले जाऊ लागले.

हे वृत्तपत्र सुरू करण्यासाठी प्रकाशक संस्था असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडने भागभांडवल उभारले आणि पक्षाच्या ५००० स्वातंत्र्य सैनिकांनी याचे समभाग घेतले. प्रारंभीच्या काळात हे वर्तमानपत्र संपादकांच्या परखड भूमिकांमुळे गाजले आणि चाललेही. डाव्या विचारांच्या पुरोगामी विचारसरणीच्या नेत्यांचा यावरील प्रभाव लपून राहिला नाही. पण काही काळातच वर्तमानपत्र चालविण्यासाठी लागणारे कसब नसल्याने हा पांढरा हत्ती चालवणे किती कठीण आहे, याची कल्पना काँग्रेसच्या नेत्यांना आली. संपादकीय दुर्लक्षामुळे पुढे या वर्तमानपत्राचा समाज आणि पक्ष कार्यकर्त्यांवरील प्रभावही निमाला. एक काळ तर असा आला की या वृत्तपत्राकडे साऱ्या देशाचेच दुर्लक्ष झाले. मात्र सुब्रमण्यम स्वामींनी याची पोल खोलल्यामुळे आर्थिक घोटाळ्याचे हे प्रकरण जगजाहीर झाले आणि जनसमान्यांमध्ये त्याची जाहीर चर्चा सुरू झाली. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या गांधी घराण्याची प्रतिमा यामुळे मलिन झाली नसती तरच नवल.

संपादकांना आणि व्यवस्थापनाला वृत्तपत्र छापण्यासाठी उभा करावयाच्या पैशांचे समीकरण न जमल्याने अखेर नॅशनल हेरॉल्ड बंद करावा लागला. पण तत्पूर्वी या वर्तमानपत्राचे व्यवस्थापन ९० कोटींच्या कर्जाच्या ओझ्याखाली दबून गेले होते. त्यावेळी प्रकाशक कंपनी असोसिएटेड जर्नल्सकडे असलेल्या २००० कोटींच्या जमिनीपैकी काही जमीन विकून कर्जाची परतफेड सहज शक्य होती. पण तसे न करता काँग्रेस पक्षाने ९० कोटींचे बिनव्याजी कर्ज या कंपनीला दिले. एखादा राजकीय पक्ष एखाद्या कंपनीला कर्ज देऊ शकतो का? हा प्रश्नही त्यावेळी कोणी नॅशनल हेरॉल्डच्या संचालकांना विचारण्याचे धाडस दाखविले नाही. खरे तर हे वर्तमानपत्र गांधी घराण्याचे एकट्याचे नव्हते. त्यामुळे बिनव्याजी कर्ज देण्याचा निर्णय घेताना संचालक मंडळाची अनुमती घ्यायला हवी होती. पण तशी घेतली गेल्याची नोंद नाही. त्याचवेळी ज्या ५ हजार स्वातंत्र्य सैनिकांकडून भागभांडवल उभारले गेले, त्यांनाही या बिनव्याजी कर्जाबाबत काही कळविले गेले नाही. एकंदरीत कर्ज देणारे सोनिया गांधी, राहुल गांधी यांचा काँग्रेस पक्ष, कर्जाची परतफेड कशी करावी, हे सुचविणारा पक्षही काँग्रेसच आणि यंग इंडियन ही कंपनीही गांधी घराण्याचे वर्चस्व असलेली पूर्वीची ५ लाखांच्या भांडवलाने प्रारंभ झालेली गांधी घराण्याची कंपनी. त्यामुळे आपल्यासाठी, आपल्यामार्फत, आपल्या लोकांनी केलेला घोटाळा असे याचे वर्णन केले तर अतिशयोक्ती होणार नाही. या नियतकालिकाच्या निमित्ताने गांधी कुटुंबाने केलेली लूट निदर्शनास आल्यामुळेच त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल झाले आहे. गांधी कुटुंबाने यातून पत्रकारितेची मूल्येच पायदळी तुडविली आहेत. या पृष्ठभूमीवर देशातील जनतेने आता कुठे गेले संविधान आणि त्याच्या नावे देशातील जनतेची सेवा करण्याची घेतलेली प्रतिज्ञा, असा प्रश्न उपस्थित केला तर वावगे वाटून घेऊ नये.

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# उद्याचे स्मार्ट वाहन

वाहन म्हणजे दळणवळणासाठी एक अत्यावश्यक बाब. मानवाने वाहनांचा उपयोग केल्याची नोंद हजारो वर्षांपासून आहे. पहिल्या जलयानाचा शोध सुमारे सात ते नऊ हजार वर्षांपूर्वी लागला असावा असे काही पुराव्यांवरून दिसून आले आहे. सुमारे सात हजार वर्षांपूर्वी समुद्रावर चालू शकेल अशी नौका कुवेतमधील उत्खननात दिसून आली. प्राण्यांचा वापर करून प्रवास ही पद्धत अनेक शतकांपासून लोकप्रिय आहे आणि अजूनही अनेक दुर्गम भागात प्रचलित आहे. उद्याच्या तंत्रमय भविष्यात अनेक पैलू क्रांतिकारी पद्धतीने बदलणार आहेत. अनेक उपकरणे, प्रथा, प्रक्रिया कालबाह्य होतील. मग या सर्व उत्क्रांतीला वाहन कसे अपवाद ठरेल? विसाव्या शतकात संगणक जन्माला आले. पूर्वी खूप मोठ्या आकाराचे हे उपकरण स्वस्त, छोटे आणि शक्तिशाली होत गेले. हे तिन्ही प्रवाह एकाच वेळी कार्यरत होते. पण भौतिक जग आणि संगणकीय बिट, बाईटचे व्हर्च्युअल जग पूर्णपणे वेगळे होते. त्यांची एकमेकात ढवळाढवळ नव्हती. उदा. वाहनाचे फ्युएल गेज फक्त इंधनाची पातळी सांगायचे आणि संपत आले की लाल दिवा लागायचा. पण हे चित्र २०१० नंतर बदलू लागले. २०२६ नंतर तर त्यात आमूलाग्र बदल घडतील. सेलफोन, जीपीएस, इंटरनेट आणि नॅनो ऊर्फ सूक्ष्म तंत्रज्ञान यांच्या संगमातून एक अत्यंत वेगळ्याच प्रकारचे स्मार्ट जग लवकरच आपल्या आसपास दिसू लागणार आहे. संगणकीय सूक्ष्मतंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल. किंबहुना, तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहजपणे हा बदल होणार आहे. याला ‘स्मार्ट कॉम्प्युटिंग’ म्हटले जाते.

नजीकच्या भविष्यकाळात ‘तुमचा हरवलेला चष्मा मोठ्या बेडरूममधल्या पलंगावरील उशीखाली आहे’ हे सांगण्याचे काम हे तंत्रज्ञान करेल किंवा एक-दोन किलोमीटरवर वाहतूक-कोंडीची लक्षणे दिसू लागताच गाडीतील जीपीएस यंत्रणा पर्यायी मार्ग शोधेल. तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, तसतशी आपली वाहनेही अधिकाधिक स्मार्ट होत चालली आहेत. उद्याचे वाहन केवळ चालवण्यापुरते मर्यादित न राहता, आपले साथीदार, मदतनीस आणि सुरक्षिततेचे संरक्षक ठरणार आहे. उद्याचे स्मार्ट वाहन हे पूर्णपणे इंटरनेटशी जोडलेले असेल. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि सेन्सर टेक्नॉलॉजी यांचा वापर असेल. याव्यतिरिक्त, स्मार्ट वाहने प्रदूषणविरहित असतील. ती सौर किंवा विद्युत ऊर्जेवर चालतील. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल आणि हवामान बदलावरही सकारात्मक परिणाम होईल. उद्याचे स्मार्ट वाहन हे अधिक आरामदायक, कार्यक्षम आणि सुरक्षित असेल. ते अधिक वैयक्तिकृत आणि कनेक्टेड असेल आणि अधिक लवचीक आणि अत्याधुनिक प्रवास पर्याय प्रदान करेल. उद्याचे वाहन रचनेच्या बाबतीतही बदलत आहे. त्यात सुटे हलते भाग कमी होऊन सिलिकॉन चिप्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, लिथियम बॅटरी असे अवयव असतील. चालकासमोरचा डॅशबोर्ड अधिकाधिक स्मार्ट होऊन चालकाला बॅटरी किती चार्ज आहे, जवळ चार्जिंग स्टेशन कुठे आहे, ट्रॅफिक जाम व वाहतुकीच्या मार्गाचा स्मार्ट सल्ला इत्यादीची इत्थंभूत माहिती देईल.



उद्याचे स्मार्ट वाहन अधिक आरामदायक आणि कार्यक्षम असेल. ती अधिक प्रगत सस्पेन्शन आणि सीटिंग सिस्टिमसह येतील, जी अधिक आरामदायक प्रवास अनुभव प्रदान करतील. त्यात अधिक कार्यक्षम इंजिन असेल आणि ऊर्जा-सक्षम घटकांसह जास्त मायलेज आणि कमी उत्सर्जन देईल. इथे इलेक्ट्रिक, हायब्रीड असे अनेक घटक समाविष्ट असतील. स्मार्ट वाहने इंटरनेट आणि इतर उपकरणांशी सतत जोडलेली राहतील. यामुळे त्यांना रिअल टाईम वाहतूक माहिती, हवामानाचा अंदाज आणि इतर उपयुक्त माहिती मिळत राहील. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक सुरक्षित असेल. स्वयंचलित ब्रेकिंग, लेन-बदल करण्यात मदत आणि अंधारात दृष्टी या बाबतीत ते चुणूकदार ठरेल. चालक गाडी ठीक चालवत नसेल तर ते अनेक प्रकारे त्याला सूचना देईल. गजर, झटका, समोरील वाहन वेगात उलट येत असेल तर आपोआप स्टिअरिंग वळवणे, अनेक निकटवर्तीयांना आपत्कालीन संदेश पाठवणे आदी गोष्टी करेल. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक वैयक्तिकृत असतील. ते अधिक वैयक्तिकृत इंटीरियर आणि एक्सटीरियर डिझाईनसह उपलब्ध होईल, जे चालक आणि प्रवाशांच्या आवडीनिवडी पूर्ण करेल. प्रत्येक व्यक्ती वेगळी असल्यामुळे तिच्या वाहनाबद्दलच्या गरजा वेगळ्या असतात. उद्याचे स्मार्ट डिस्प्ले तंत्रज्ञान तुम्हाला स्मार्टफोन स्क्रीन समोर दाखवेल आणि ध्वनी सहायक तुम्हाला वाहन चालवत असताना संदेश ऐकवेल. त्यातील एआय टूल आपोआप काही निर्णय घेईल. वाहनातील मनोरंजन प्रणाली अधिक प्रगत असेल आणि प्रवाशांना चित्रपट पाहणे, संगीत ऐकणे किंवा ऑनलाईन काम करणे शक्य होईल.

अलिकडच्या काही वर्षांमध्ये वाहतुकीच्या मोठ्या प्रमाणावर विद्युतीकरणाला राष्ट्रीय प्राधान्य मिळाले आहे. नॅशनल इलेक्ट्रिक मोबिलिटी मिशन प्लॅन २०२० आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने बॅटरीवर चालणाऱ्या दुचाकी, रुग्णवाहिका, ट्रक आणि तीनचाकी वाहनांसाठी दोन वर्षांच्या कालावधीत १०,९०० कोटी रुपयांच्या ई-ड्राईव्ह योजनेला मंजुरी दिली आहे. त्याअंतर्गत ८८,५०० साईट्सवर चार्जिंगची सुविधा उपलब्ध होईल. गेल्या दशकापासून मात्र हायड्रोजनवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. या वाहनांचा बोलबाला इलेक्ट्रिक कार्सइतका नसला तरी बीएमडब्ल्यू आणि स्टोलांटिस या मोठ्या कंपन्यांनी याबाबतच्या संशोधन आणि विकास कार्यक्रमांमध्ये मोठी गुंतवणूक केल्याने या क्षेत्राकडे अनेकांच्या नजरा वळल्या आहेत. अनेक देशांनी आपापल्या वाहन उत्पादकांवर कमीत कमी धूर सोडून पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (व इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे आणि वापरण्याचे बंधन आता घातले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाच्या पारंपरिक चित्रात आणि एकंदर रचनेमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यातलेच एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही हायड्रोजन कार चालते कशी हे आपण थोडक्यात वाचू. इथे हायड्रोजन पेट्रोलप्रमाणे, थेट जाळला जात नाही तर त्यातील रासायनिक ऊर्जेचे रूपांतर विजेमध्ये केले जाते. या विजेवर गाडीची चाके फिरवली जातात. मुख्य म्हणजे या वाहनाच्या एक्झॉस्ट पाईपमधून धूर नाही तर चक्क पाणी बाहेर येते; परिणामी प्रदूषण शून्य!

हायड्रोजन तीन प्रकारे मिळतो. पेट्रोलियमच्या उत्पादन प्रक्रियेतून, कोळशापासून आणि पाणी व सेंद्रिय कचऱ्यातून. ‘ग्रीन’ म्हणजेच पर्यावरणस्नेही असल्याने या तिसऱ्या प्रकारच्या हायड्रोजनचा वापर या वाहनांसाठी केला जातो. या सर्व नवसंशोधनांकडे पाहताना कोणतेही एक विशिष्ट तंत्रज्ञानच श्रेष्ठ मानून त्याचाच वापर करण्याचा आग्रह धरण्यापेक्षा, सर्वोत्तम विविध तंत्रांचे एकत्रीकरण करून पर्यावरण रक्षणाचा अंतिम हेतू साध्य करणे महत्त्वाचे आहे, असे म्हणता येईल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नीलेश जोशी

# जीवघेणे ध्वनिप्रदूषण थांबविण्याची गरज

नाशिक येथे डिजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे एका तरुणाचा बळी गेल्याची बातमी आली आणि ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. खरं म्हणजे नाशिकच्या युवकाच्या शवविच्छेदनातून मृत्यूचे कारण वेगळे असल्याचे जरी समोर आले असले तरी ध्वनिप्रदूषणामुळे होणारे दुष्परिणाम जीवघेणेच ठरत आहेत. ध्वनिप्रदूषणाच्या समस्येने आता राक्षसी रूप धारण केले आहे. हृदय कंपित करणाऱ्या आवाजाचा मानव आणि प्राणी जीवनावर नकारात्मक होणारा परिणाम समजूनही माणूस उमजून का घेत नाही, हा खरा प्रश्न आहे. विशेष म्हणजे शासनाने याबाबत अनेक उपाययोजना कायदे केले आहेत पण दुर्दैवाने त्याची अंमलबजावणी मात्र दिसून येत नाही. त्यामुळे ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांना या कायद्याची भीती वाटेनासी झाली आहे. असेच होत राहिले तर मग या ध्वनिप्रदूषणाच्या समस्येला आळा घालावा तरी कोणी याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे.

फार पूर्वी नव्हे तर गत ४० वर्षांपूर्वी आपल्या सर्वांची पहाट ही चिमण्यांच्या सुंदर, सुसह्य व मंजुळ अशा चिवचिवाटाने होत असे. पक्ष्यांच्या या आवाजाने तेव्हा फारच सुखद वाटत होते. पण आता हे चित्र पार बदलले आहे. प्रदूषणामुळे चिमण्यांचा जीवच धोक्यात आला आहे. भौतिक, औद्योगिक प्रगतीचे नवनवीन उच्चांक आम्ही गाठले आहेत. मात्र ही प्रगती साधत असतानाच जीवनाच्या शाश्वत आनंदाला आम्ही मुकतो आहोत का? केवळ आनंद नव्हे तर जीवावर बेतणारे ध्वनिप्रदूषण आम्ही केव्हा थांबविणार आहोत हा खरा प्रश्न आहे. ध्वनिप्रदूषणामुळे हृदयविकार, उच्च रक्तदाब आणि कोरोनरी धमनी रोगाचा धोका वाढतो.



शिवाय मानसिक ताणतणाव, झोपेतील अडथळे, ऐकण्याची क्षमता कमी होणे आणि संज्ञानात्मक क्षमतेत घट होणे यासारखे त्रास होतात. कर्कश आवाजातील डिजेसारख्या यंत्रांनी श्रवणशक्ती कमी होणे, टिनिटस (कानात आवाज येणे) आणि बहिरेपणा होण्याचा धोका वाढला आहे. शिवाय यातून मानसिक ताणतणाव, चिंता, चिडचिड, निराशा पदरी पडत असून शांत राहण्याची गरज असताना स्वभावात विनाकारण आक्रमकता निर्माण होत आहे. त्याशिवाय चांगली झोप न लागणे, झोपेत अडथळे आणि झोपेचे घड्याळ बिघडणे अशा समस्या उभ्या ठाकल्या आहेत.

पुरेशी झोप झाली नाही तर अनेक शारीरिक, मानसिक समस्या उद्भवतात यासह ध्वनिप्रदूषण गर्भवती महिलांसाठी तर अत्यंत धोकादायक आहे. याचा तिच्या गर्भावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो व परिणामी तिच्या होणाऱ्या बाळाला अपंगत्वही येऊ शकते. त्याशिवाय सततच्या भयंकर व कानठळ्या बसविणाऱ्या आवाजामुळे मानवी मज्जासंस्थेवर प्रतिकूल परिणाम होऊन थकवा आणि तणाव वाढतो. ही समस्या येथेच संपत नाही तर याचा वन्यजीवावर प्रतिकूल परिणाम होतो. मानवापेक्षा देवाने प्राणी आणि पशू-पक्षी यांना दूरवरील आवाज ओळखण्याचे वरदान दिले आहे. त्यांना जमिनीच्या हालचालीवरून निसर्गात काय बदल होतात हे कळते आणि अशा कर्कश ध्वनिप्रदूषणाने त्यांच्याही जिवाला धोका असल्याचे त्यांना जाणवते आणि ते मनुष्याविरुद्ध आक्रमक होऊ शकतात. त्यांच्या प्रजननावरही याचा परिणाम होतो, असा इशारा तज्ज्ञांनी वेळोवेळी देत काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. पण त्याला योग्य प्रतिसाद मिळत नाही. हे वास्तव आहे.

ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी कडक नियमावली, जनजागृती, आणि योग्य नियोजन आवश्यक आहे. वाहतूक आणि औद्योगिक क्षेत्रातील आवाजाचे नियंत्रणासह विविध सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक कार्यक्रमातून होणारा डिजेचा ठणठणाट वेळीच थांबविण्याची गरज आहे. खरं म्हणजे सुमधुर संगीताद्वारे आनंद पेरणे ही आमची परंपरा पुन्हा सुरू करण्याची नितांत आवश्यकता आहे. पण सोबतच सद्य:स्थितीत असलेल्या ध्वनिप्रदूषण या गंभीर आणि जीवघेण्या प्रश्नाचे उत्तर शोधून याबाबतच्या उपाययोजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे, हे निश्चित.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# भाजपा-अण्णाद्रमुक मैत्रीचा नवा अध्याय

तामिळनाडूत भाजपा आणि अण्णाद्रमुक यांच्यात पुन्हा एकदा युती झाली आहे. पुन्हा एकदा यासाठी म्हटले की, याआधी राज्यात या दोन पक्षांची युती होती; ज्याचा फायदा दोन्ही पक्षांना मिळत होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाजपा आणि अण्णाद्रमुक युतीची घोषणा केली. राष्ट्रीय पातळीवर नरेंद्र मोदी तर राज्यात अण्णाद्रमुकचे पलानीसामी यांच्या नेतृत्वात ही युती काम करेल, असे शाह यांनी जाहीर केले.

अण्णाद्रमुकशी युती झाल्यामुळे भाजपाला दक्षिण भारतात तेलगू देसमनंतर आणखी एक मित्रपक्ष मिळाला आहे. याचा फायदा अण्णाद्रमुकला जसा मिळणार तसाच भाजपालाही होणार आहे. त्यामुळे या युतीने राज्याच्या राजकारणात नवा अध्याय सुरू झाला आहे. अण्णाद्रमुकच्या सर्वेसर्वा जयललिता यांच्या काळात भाजपा आणि अण्णाद्रमुक यांची युती होती. शिवसेना आणि अकाली दल बादल यांच्यासारखाच अण्णाद्रमुक हाही भाजपाचा अतिशय जुना मित्रपक्ष होता. या युतीने द्रमुकला अनेक वेळा सत्तेबाहेरही केले होते. पण जयललिता यांच्या मृत्यूनंतर अण्णाद्रमुकमध्ये फूट पडली. परिणामी दोन पक्षांतील संबंधात तणाव निर्माण झाला. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधीच या दोन पक्षांची युती तुटली. २०२४ ची लोकसभा निवडणूक राज्यात भाजपा आणि अण्णाद्रमुक यांनी वेगवेगळी लढवली आणि त्याचा फटका दोन्ही पक्षांना बसला. द्रमुक आणि काँग्रेस आघाडीला मात्र त्याचा फायदा मिळाला.

राज्यातील लोकसभेच्या ३९ पैकी २२ जागा द्रमुकने जिंकल्या. काँग्रेसला ९ जागा मिळाल्या. अण्णाद्रमुकला एक जागा जिंकता आली. मात्र, भाजपाला एकही जागा मिळाली नाही. एकही जागा जिंकू न शकणाऱ्या भाजपाला राज्यात ९ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसपेक्षा जास्त मते मिळाली होती. भाजपाच्या मतांची टक्केवारी ११.२४ होती, तर काँग्रेसची १०.६७. सर्वाधिक २२ जागा जिंकणाऱ्या द्रमुकला २६.९३ टक्के मते मिळाली. फक्त एक जागा जिंकणाऱ्या अण्णाद्रमुकला २०.४६ टक्के मते मिळाली होती. भाजपा-अण्णाद्रमुक युतीमुळे या दोन पक्षांच्या मतांची टक्केवारी ३२ होत आहे; ज्याचा फायदा राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत या युतीला नक्कीच मिळू शकतो.

अण्णाद्रमुक-भाजपा युतीची सुरुवात १९९८ मध्ये पहिल्यांदा झाली. यावर्षीची लोकसभा निवडणूक या दोन्ही पक्षांनी लढवली. अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वातील भाजपाच्या सरकारला अण्णाद्रमुकने पाठिंबा दिला. मात्र, या दोन पक्षांची युती वर्षभरच टिकली. जून १९९८ मध्ये विशेष न्यायालयाने भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या जयललिता आणि त्यांच्या सहकाऱ्यांची जवळपास १२ कोटींची संपत्ती जप्त करण्याचा आदेश दिला. जयललिता यांना जामीन मिळावा म्हणून अण्णाद्रमुकच्या खासदारांनी राज्यातील द्रमुकचे सरकार बरखास्त करण्याची मागणी तेव्हा पंतप्रधान असलेल्या अटलबिहारी वाजपेयींकडे केली. मात्र ही मागणी न्याय्य नसल्यामुळे वाजपेयींनी ती फेटाळली. परिणामी अण्णाद्रमुकने वाजपेयी सरकारचा पाठिंबा काढला. भाजपावर नाराज झालेल्या जयललितांनी १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसशी आघाडी केली. त्यामुळे भाजपाला द्रमुकशी युती करावी लागली.

पाच वर्षांनंतर म्हणजे २००४ मध्ये तामिळनाडूच्या राजकारणात मोठे फेरबदल झाले. द्रमुक रालोआतून बाहेर पडला तर अण्णाद्रमुक पुन्हा भाजपासोबत आला. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि अण्णाद्रमुक सोबत होते, पण या निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला; भाजपाला सत्तेबाहेर जावे लागले. अण्णाद्रमुकला लोकसभेची एकही जागा जिंकता आली नाही. त्यामुळे अण्णाद्रमुकने पुन्हा एकदा भाजपासोबतची युती तोडली. २०१६ मध्ये जयललिता यांचा मृत्यू झाला. अण्णाद्रमुकमध्ये नेतृत्वावरून वाद निर्माण झाला. परिणामी त्या पक्षात दोन गट पडले. त्यामुळे अण्णाद्रमुकने पुन्हा एकदा भाजपासमोर मैत्रीचा हात केला. २०१९ ची लोकसभा निवडणूक भाजपा आणि अण्णाद्रमुक यांनी एकत्रित लढवली. राष्ट्रीय पातळीवर भाजपाला लक्षणीय यश मिळाले. मात्र, तामिळनाडूत भाजपाला एकही जागा जिंकता आली नाही, अण्णाद्रमुकला एक जागा मिळाली. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीतही भाजपासोबतची युती कायम ठेवण्याची घोषणा अण्णाद्रमुकचे पलानीसामी आणि पनीरसेल्वम यांनी केली. झालेल्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत या युतीला जनतेने पुन्हा एकदा नाकारले.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर दोन पक्षांतील संबंधात पुन्हा तणाव निर्माण झाला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत हे संबंध पूर्णपणे विकोपाला गेले. तामिळनाडू प्रदेश भाजपा अध्यक्ष के. अण्णामलाई यांना यासाठी जबाबदार धरले गेले. अण्णामलाई यांनी राज्यात स्वबळावर लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारी केली. मात्र त्यांचा प्रयत्न फसला. लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर अण्णामलाई यांनीही पदावरून पायउतार होण्याची घोषणा केली. भाजपाने प्रदेश भाजपाचे अध्यक्ष म्हणून नैनार नागेंद्रन यांच्या नावाची घोषणा केली. विशेष म्हणजे भाजपात येण्याच्या आधी नागेंद्रन अण्णाद्रमुकमध्ये होते. २०१७ मध्ये ते भाजपात आले. भाजपात आल्यानंतरही अण्णाद्रमुकमधील नेत्यांशी नागेंद्रन यांचे मैत्रीपूर्ण संबंध कायम आहे. भाजपाने अण्णाद्रमुकशी मैत्रीपूर्ण संबंध असणाऱ्या नेत्याच्या हातात तामिळनाडू भाजपाची सूत्रे सोपविली आहे. जयललिता यांच्या मंत्रिमंडळात २००१ ते २००६ या काळात नागेंद्रन मंत्री होते. २००६ आणि २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. २०११ मध्ये नागेंद्रन विजयी झाले, पण त्यांचा जयललिता यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. जयललिता यांच्या निधनानंतर नागेंद्रन यांनी भाजपात प्रवेश केला. भाजपातर्फे २०१९ आणि २०२४ ची लोकसभा निवडणूक त्यांनी लढवलीही, पण त्यातही त्यांचा पराभव झाला. भाजपा अण्णाद्रमुकशी मैत्री करणार असल्याचे संकेत भाजपाने नागेंद्रन यांच्या नियुक्तीतून दिले होते. भाजपाच्या राष्ट्रीय नेतृत्वाने यावेळी व्यावहारिक निर्णय घेत अण्णाद्रमुकशी युती करण्याची घोषणा केली. याची घोषणा गृहमंत्री अमित शाह यांनी केल्यामुळे हा निर्णय भाजपाच्या नेतृत्वाचा असल्याचे दिसून येते.

दक्षिण भारतात भाजपाला आपला विस्तार करायचा आहे, पण दक्षिण भारतातील केरळ, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू या पाचपैकी एकाही राज्यात सध्या भाजपाची सत्ता नाही. कर्नाटकमध्ये काही वर्षांपूर्वी भाजपाने विजय मिळविला होता, पण कर्नाटक वगळता दक्षिण भारतातील एकाही राज्यात भाजपाची डाळ कधी शिजली नाही. त्यामुळे आता भाजपाने दक्षिण भारतात मित्रपक्षांना सोबत घेण्याचा निर्णय घेतला आहे; त्या मालिकेत आंध्रप्रदेशात भाजपाने तेलगू देसमचे चंद्राबाबू नायडू यांना सोबत घेतले. आता तामिळनाडूत अण्णाद्रमुकसमोर पुन्हा मैत्रीचा हात केला आहे. काही मुद्यावर तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी घेतलेल्या निर्णयामुळे राज्यातील जनतेत नाराजी आहे. त्याचा फायदा आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि अण्णाद्रमुक आघाडीला मिळू शकतो. त्यामुळे भाजपाच्या राष्ट्रीय नेतृत्वाला या युतीकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### पर्यावरणपूरक पत्रावळ, द्रोण लुप्त होण्याच्या मार्गावर!

राज्यासह देशात लग्नसराई व धार्मिक कार्यक्रमांमध्ये प्लॅस्टिक, कागदी व थर्माकोलच्या पत्रावळीचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतो आणि या पत्रावळी मानवाच्या व पशूंच्या आरोग्यासाठी दिवसेंदिवस विष बनताना दिसत आहे. अनेक वर्षांपासून झाडांच्या पानांच्या पत्रावळीवर जेवणाची परंपरा चालत होती. यातूनच ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात रोजगारसुद्धा मिळत असे. परंतु आता अत्याधुनिक युगात यंत्राच्या साहाय्याने प्लॅस्टिक, कागदी व थर्माकोल यावर आवरण असलेल्या पत्रावळी व द्रोण विक्रीला आल्याने आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत घातक सिद्ध होत आहे. तरीही आपण त्याचा वापर सर्रास करीत आहोत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. राज्यासह देशात आपण निसर्गावर अहोरात्र बेछूट अत्याचार, अन्याय आणि हत्या करीत असल्याने अनेक महत्त्वपूर्ण वृक्ष नामशेष होत आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे आपण पूर्वी ज्या पर्यावरणपूरक पत्रावळीत आनंदाने जेवणाचा आस्वाद घेत होतो, तो आज पूर्णपणे संपुष्टात आला आहे. आज कागदी पत्रावळी, द्रोण, प्लॅस्टिक पत्रावळी, द्रोण, थर्माकोलच्या पत्रावळी-द्रोण या वस्तूंनी संपूर्णपणे जेवणाच्या पर्यावरणपूरक पत्रावळी -द्रोणावर हल्ला करून नामशेष केला आहे. आज वृक्षतोडीमुळे आपल्यावर अशी दुर्गती आली आहे. पानांच्या पत्रावळीत केलेले जेवण पचनास हलके, रुचकर आणि आनंददायी वाटायचे. त्यामुळे पत्रावळीतील जेवणाचा स्वाद निराळाच होता. ज्या वनस्पतींपासून किंवा वृक्षांपासून ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होऊ शकते अशा वृक्षांना पुनरुज्जीवित करून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे. यामुळे पर्यावरणपूरक पत्रावळी-द्रोण तर मिळतीलच सोबतच वाढत्या हवामानातील बदलांवर मात करण्यास थोडी का होईना मदत अवश्य होईल.

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

● ● ● ●

### दीनदयाल नगरात भुरट्या चोरांचा सुळसळाट

उन्हाळा सुरू झाला की भुरटे चोर बिळातून बाहेर निघतात व छोट्या मोठ्या चोरी करून पसार होतात. सध्या दीनदयालनगर वस्तीमध्ये हे प्रकार वाढले आहेत. दोन-तीन दिवसांपूर्वी आमच्या घरी काही कारणास्तव खाली पार्किंगमध्ये ठेवलेली ॲल्युमिनियमची शिडी गायब झाली, त्याच दरम्यान वस्तीत राहणारे उबगडे यांच्याकडील अंगणात ठेवलेल्या बादल्या चोरीस गेल्या. ऊन वाढल्यामुळे कूलर सुरू झाले आहेत, ग्रीन नेटमुळे घराचा बराचसा भाग झाकलेला असतो व दुपारी सामसूम झाली की या चोरांच्या कारवाया सुरू होतात. तेव्हा दीनदयाल वस्तीतील नागरिकांनी जागरूक राहावे, सतर्क राहावे. अशा छोट्या मोठ्या चोरींची पोलिस तक्रार पण निरर्थक असते. कारण ते एकच सल्ला देणार की सीसीटीव्ही लावा. शेवटी असे छोटे छोटे नुकसान निमूटपणे सहन करून समाधानी राहावे व गेलेली वस्तू आपल्यासाठी नव्हतीच हा साधा सरळ उच्च विचार मनाशी बाळगून जीवनरथ चालता ठेवावा अन्यथा सीसीटीव्ही लावून आपले समाधान करावे.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### लोक विरोधक किंवा शत्रू का होतात?

समाजात काही व्यक्ती सामाजिक बांधिलकी जपून स्वतःला समाजाच्या भल्यासाठी, समाजाच्या हितासाठी, दीन, दुबळे, गोरगरीब, दिव्यांग यांच्या भल्यासाठी स्वतःला झोकून देऊन सतत कार्यरत असतात. अशा व्यक्तींचा स्वतःचा कोणताही फायदा वा लाभ नसतो. मात्र त्यांचा पिंड सामाजिक काम करण्याचा असतो. ‘कोणी वंदो अथवा कोणी निंदो’ ते सतत छोटे-मोठे समाजकार्य करीत असतात. यामुळे समाजातील प्रत्येक घटकाच्या ओठावर त्या व्यक्तीचे नाव असते. ही समाजकार्य करणारी व्यक्ती आपल्या सामाजिक कामात सदैव मग्न असते, ती व्यक्ती सामाजिक दायित्व जपत असते. शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ या दीन, दुबळ्यांना मिळवून देते, पर्यावरण बाबत सतत जागरूकता करीत असते, स्वच्छता असेल, माझी वसुंधरा असेल किंवा ‘माझं गाव- माझा विकास’ या योजना तळागालातल्या घटकांपर्यंत पोहचवून त्यांच्या कृतीत उतरवत असते. अशा व्यक्तीचे सर्वच स्तरावर कौतुक होत असते.

शासन व काही सामाजिक दूरदृष्टीअसलेले मंडळ, संस्था स्वतःहून दखल घेऊन अशा सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कामाचा विविध पुरस्कार देऊन गौरव करीत असते. हे समाजातील बहुतांश लोकांना सहन होत नाही. समाजकार्य करणाऱ्या व्यक्तीचा दोष नसला तरी किंवा काही चुकत नसले तरी काही लोक अशा व्यक्तीकडे बोट उचलतात.

या सामाजिक कार्य करणाऱ्याची प्रतिष्ठा त्याच्या समाजसेवेमुळे सतत वाढत असते. या सामाजिक बांधिलकी जपून कार्य करणाऱ्या व्यक्तीला सतत प्रसिद्धी मिळत असते, त्यामुळे अशा व्यक्तीचे विरोधक, शत्रू मोठ्या संख्येने वाढत असतात. मात्र कितीही विरोधक वाढोत, कितीही शत्रू वाढोत सामाजिक बंधिलकी जपणाऱ्या समाजसेवकाने आपला समाजसेवेचा पिंड कदापिही त्यागू नये.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत
# छोटे उस्ताद



## तुम्हाला माहिती आहे का?

- कवरत्ती ही लक्षद्वीपची राजधानी आहे.
- आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या न्यायाधीशांचा कार्यकाळ ९ वर्षांचा असतो.
- कुचीपुडी नृत्यशैली आंध्र प्रदेशची आहे.
- नाटोचे मुख्यालय ब्रुसेल्स इथे आहे.
- कम्युनिस्ट जाहीरनामा कार्ल मार्क्सने लिहिला.

## अशी पाखरे येती

**निशिकांत मायी** / ९८८११५२४३९

## भिरभिर भिंगरी



दिसायला अतिशय गोंडस, चकाकदार आणि ओळखायला सोपा असणारा भिंगरी हा पक्षी स्थलांतरित असला तरी, हिवाळ्याच्या दिवसात विद्युत तारांवर थवेच्या थवे विहार करताना वातावरण प्रसन्न करून सोडतात. खुल्या माळरानांवर यांचा अधिवास अधिक प्रमाणात दिसून येतो. शेतीच्या ठिकाणीही यांचे वास्तव्य असते. सोबतच संपूर्ण महाराष्ट?ातील तलाव व नद्यांनजिक भिरभिर फिरताना भिंगरी आढळून येते. माळ भिंगरी असेही या पक्ष्यास म्हटले जाते. सुमारे १८ सेंमी लांबीचा असलेल्या भिंगरी पक्ष्याच्या छाती तसेच वरील बाजूस चकाकदार निळा रंग असून, कपाळ व गळा चटक लाल असतो. त्या खालील बाजू पांढरी असते तर, शेपटीची दोन पिसे एखादा दोरा असल्यासारखे लांबच लांब असते. त्याच्या याच वैशिष्ट्यामुळे त्याला ?'तारवाली भिंगरी?' असेही संबोधले जाते. ताडोबाच्या जंगलात अनेक प्रकारचे भिंगरी विहार करताना आढळले आहेत. झाडांच्या ढोलीमध्ये या पक्ष्याची वसाहत असते. नर भिंगरी दिसायला देखणा असून, गडद चमकदार निळीशार पाठ, पांढरेशुभ्र पोट आणि केशरी तपकिरी लालसर डोक्याचा भाग नर पक्ष्याचा असून, शेपटीच्या मधून तारेसारखी पिसे बाहेर आल्यासारखी दिसतात. शेपटीकडील ही पिसे नराची लांब तर मादी भिंगरीची लहान असते. मादी भिंगरीची कथा थोडी वेगळी आहे. हवेतले कीटक सहज गटकवण्याचे कौशल्य तिच्याकडे असते. मादी भिंगरी मोठा आ वासून, हवेत उडत असल्यामुळे तिचे मागील केस विहरत राहतात अन्?? त्यात अनेक कीटक अडकतात. भिंगरीलाही तेच हवे असते. कीटक अडकताच ती फस्त करते. उत्तराखंडातून महाराष्ट?ात येणारे भिंगरी शेतकऱ्याचे मित्रही असतात कारण, हे पक्षी हवेतल्या हवेतच कीटकांचा चट्टामट्टा करतात. सामूहीकरीत्या हवेत विहार करताना या पक्ष्यांचा थवा पाहताना आपण जणू काही एखादे सुंदर नृत्यच पाहात आहोत की काय, असा भास होतो. हवेतल्या हवेत अतिशय मोहक हालचाली करीत हा थवा आपल्या गंतव्यस्थानी जातो. साधारणपणे एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत ते आपली घरटी बांधतात. चोचीमध्ये चिखल गोळा करून निमुळते दार असलेली त्यांची घरटी ही वैशिष्ट्यपूर्ण असून ती खूप वर्षे टिकतात. मातीच्या भांड्यांसारखी वाटणारी ही घरटी मजबूत आणि सुंदर असतात. मादी भिंगरी एका वेळी तीन ते चार अंडी घालतात. छोटासा भिंगरी पक्षी विलोभनीय आणि मनमोहक असतो.

## Word puzzle


### Identify Bird Names

Find and circle all bird names in that are hidden in the grid.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| G | J | I | L | O | P | B | V | C | X |
| T | E | A | G | L | E | K | N | L | M |
| S | Z | X | A | Q | E | E | Y | U | D |
| R | D | C | G | K | S | Q | P | D | O |
| B | I | R | G | Y | I | R | F | U | Z |
| U | S | O | P | E | A | C | O | C | K |
| L | R | W | V | B | N | H | R | K | A |
| S | P | A | R | R | O | W | O | J | F |
| T | D | O | V | E | S | X | V | W | Q |
| J | X | Z | A | F | E | R | Q | O | L |

**Previous Math puzzle answer :**
**1) 11 2) 125 3) 25 4) 16 5) 49**

## शब्द कोडे




**आडवे शब्द :–** 2. सत्याची बाजू सांभाळण्यासाठी केलेले अहिंसक आंदोलन
3. दाट परिचय, विशेष ओळख, जवळीक साधणे
4. इतरांपेक्षा श्रेष्ठ, अधिक श्रेष्ठ, चांगला
7. सर्वांशी मिळून मिसळून राहणे, एकजीव झालेला

**उभे शब्द :–** 1. सोबत राहणे, संगत
2. पौष्टिक, सत्त्वयुक्त
5. अनेक मजली इमारतीत असलेला फ्लॅट, अपार्टमेन्ट
6. शब्दांचा संयोग घेऊन झालेला एक शब्द, लेखाच्या बाजूस कागदावर सोडलेली कोरी जागा

**मागील अंकजालचे उत्तर**




## वंडर गर्ल कौमुदी साल्पेकर

**बालमित्रांनो!** कला अनेक आहेत. पण, अशी कला ज्यामध्ये संगीत आहे, केल्यास नृत्य आहे, निवेदन आहे, प्रार्थना आहे आणि अभिनय तर आहेच. अशी कला म्हणजे 'कीर्तन कला!' कीर्तन करणं सोपं नाही. मुख्य म्हणजे कीर्तन करताना तुम्हाला अभ्यास करावा लागतो. ज्या विषयावर आपण कीर्तन करतो त्यावर अभ्यास केल्याशिवाय कीर्तन करता येत नाही आणि केल्यास प्रेक्षक विश्वास ठेवणार नाहीत. अशीही कला सादर करायला कठीण आहे, ज्यात प्रार्थना आहे.



कीर्तनकार प्रार्थनेतून भगवंताजवळ मागणं मागतो आणि अंधारातून प्रकाशाकडे जायचा मार्ग दाखवतो.

**संजय पेंडसे**/९४२२४४३२९५

कीर्तनकार प्रार्थनेतून भगवंताजवळ मागणं मागतो आणि अंधारातून प्रकाशाकडे जायचा मार्ग दाखवतो. यश मिळणं तुमच्या हाती असतं पण, त्याकरता मार्गदर्शन घ्यावं लागतं. आपली वंडर गर्ल कौमुदीने अगदी लहानपणापासून त्यांच्या घराण्यात जी कला अवगत आहे, अशा कीर्तन कलेसाठी आपल्या वडिलांचं म्हणजेच विक्रांत साल्पेकर यांचे मार्गदर्शन घेतलं आणि आज कौमुदीने जवळपास अकराव्या वर्षी कीर्तन सुरू केल्यानंतर, एका वर्षात कीर्तनाचे सहा जाहीर कार्यक्रम केले आहेत.

अशा आपल्या वंडर गर्लने नुकतंच 'स्कॉलरशिप' या राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेत अभिनयाचं रौप्यपदकही मिळवलं. सुरुवातीला काही वर्षे संचेती शाळेत शिकल्यानंतर, आता ती सेवा सदन सक्षम या शाळेची सातव्या वर्गातील विद्यार्थिनी आहे. नागपुरातील बालरंगभूमीसाठी कार्यरत दिग्दर्शक रोशन नंदवंशी यांच्याकडे तिने अभिनयाचे धडे गिरवले.

शाळेत असो किंवा घरी, कोणताही कार्यक्रम असो त्यामध्ये हमखास पुढाकार घेऊन, ती निवेदन करतेच आणि आपला आत्मविश्वास वाढवते. देवश्री नंदवंशी आणि सौम्या पालीवाल या तिच्या जिवलग मैत्रिणी आहेत. हिंदी शिकवणाऱ्या शिक्षिका मनीषा योगी आणि मेधा खरे या शिक्षिका तिला खूप आवडतात कारण, त्यांचं प्रेमानं शिकवणं, सर्व कार्यक्रमात सहभागी होताना आपली वंडर गर्ल कौमुदी हीच अभ्यासाकडे ही आवर्जून लक्ष आहे. कौमुदीने तिच्या आवडत्या क्षेत्रात खूप यश मिळवावं, यासाठी तरुण भारतचा छोटे उस्ताद तिला मनापासून शुभेच्छा देतो.



## लागली सुट्टी

संपली परीक्षा
लागली सुट्टी
गोष्टीच्या पुस्तकांशी
करू या गट्टी

सुट्टीचे दिवस
असतात छान
सकाळ सायंकाळ
खेळण्यात भान

अभ्यासाची नसते
मुळीच चिंता
विचारांचा नसतो
डोक्यात गुंता

आई संगे गाठायचा
मामाचा गाव
कैऱ्या,चिंचांवर
मारायचा ताव

आजी देईल
सरबत गार
पुरणाच्या पोळीवर
तुपाची धार

सुट्टी गेली कशी
कळणार नाही
पुन्हा सुरू होई
शाळेची घाई

**- रवींद्र चालीकवार**
९०११५५९१०६



तरुण भारतचा अभिनव उपक्रम

# ज्ञानांजली!

## प्रश्नसंच - ८

### कोण कोणास म्हणाले ?

१) **जाणता कायद्याला। याचा पाहिजे होता केला। विचार तो पोलिसांनी।।**
अ) भास्कर जठारांना ब) जठार वकिलाला क) वकील हरी पाटीलला ड) भास्कर हरी पाटीलला

२) **त्याचे दावी प्रत्यंतर । उगा नको करू उशीर । तुझ्या पायी ज्याचे शिर। तो का रहावा निपुत्रिक?।।**
अ) खंडू गजानन महाराजांना ब) कुकाजी खंडू पाटीलला क) बंकटलाल हरी पाटीलला ड) भास्कर कुकाजीला

३) **खऱ्या संतांचे धोरण । न कळे कोणालागोन । महापुरुष गजानन । आधुनिक संत चुडामणी ।।**
अ) बंकटलाल पितांबराला ब) दामोदरपंत बंकटलालला क) पितांबर लोकांना ड) दासगणू महाराज लोकांना

४) **कर्म मार्ग सोडून नको । विधी निरर्थक मानू नको । मात्र त्यात होऊ नको । लिप्त बाळा केव्हाही ।।**
अ) दासगणू महाराज खंडू पाटीलला ब) गजानन महाराज बंकटलालला क) गजानन महाराज व्रजभूषणाला ड) पितांबर भास्कराला

५) **जेथ जेथ ही नांदे दुफळी। तेथ तेथ ही करी होळी । अवघ्या सुरांची रांगोळी । इच्या पायी होतसे ।।**
अ) गजानन महाराज देशमुखांना ब) गजानन महाराज पाटीलांना क) दासगणू महाराज बंकटलालास ड) दासगणू महाराज लोकांना

६) **तुझ्या धनाच्या जोरावरी। उड्या या जाण निर्धारी। तो मनगटाच्या बळावरी । नेईल मला येथून ।।**
अ) गजानन महाराज व्रजभूषणास ब) गजानन महाराज गोपाळ बुटींना क) गजानन महाराज झ्यामसिंगास ड) दासगणू महाराज रामचंद्रास

७) **मी जो एकदा गुरू केला । श्रीगजानन महाराजाला । तो न आता सोडील भला । हाच माझा निश्चय ।।**
अ) पितांबर लोकांना ब) बायजा पुंडलिकाला क) पुंडलिक भागी ठाकरीणला ड) झ्यामसिंग पुंडलिकाला

८) **ऐसे शिक्षण पुढल्यांप्रती । देणे भाग निश्चिंती। ते शिक्षण हा भूपती । देईल का हो अर्भकाला ।।**
अ) टिळक लोकांना ब) गजानन महाराज लोकांना क) गजानन महाराज श्रीधर काळेंना ड) कोल्हटकर भास्करास

९) **ब्राह्मणाचे भाषण । कदा नसावे अप्रमाण । या तत्त्वालागून । न जाणती चांडाळ ते ।**
अ) गजानन महाराज गोविंदबुवास ब) गजानन महाराज भास्करास क) जठार हरी पाटीलास ड) हरी पाटील बुटीस

१०) **तू पुष्प मी आहे सूत। तू कस्तुरी मी माती सत्य । तुझ्यामुळेच आले येथ । संकट हे माझ्यावरी ।।**
अ) दासगणू महाराज लोकांना ब) भास्कर बच्चुलालास क) बंकटलाल गजानन महाराजांना ड) पीतांबर गजानन महाराजांना

## प्रश्नसंच क्र.७ चे भाग्यवान विजेते

**एकुण ५०२ जणांनी उत्तरे दिलीत. त्यापैकी खालील भाविकांनी पैकीच्या पैकी गुण प्राप्त केलेत.**

त्यांची नावे खालीलप्रमाणे : शुभांगी सूर्यवंशी, विद्या मोडक, आराध्या सूर्यवंशी, स्नेहल अवचट, ओंकार गावडे, रंजना धांडे, प्रतिभा बोरकुले, बागेश्री शर्मा, रवींद्र धांडे, लता जोशी, वर्षा पिसे, स्नेहल डांगे, शोभा कुळकर्णी,स्मिता अंधारे, श्रवण परब, मेहल भार्गव, अनघा वाचासुंदर,प्रभाकर खेडकर,जयश्री बोबडे, गौरव सूर्यवंशी,प्रसाद कावळे,अमेय बोबडे,कुंजलता सरनाईक,शांता शाह, उमेश कुळकर्णी, सुहासिनी दलाल, सर्वेशा खेडकर, सुनिता जोगळेकर, साक्षी पांडे, अपर्णा जोशी, नीता कुळकर्णी, विद्या पळसोदकर, मंजुषा कठाळे, आनंद पळसोदकर, वसुधा कोरान्ने, नीरजा धामणगांवकर, संजय काळे, अनुश्री उपाध्ये, माधुरी बंडबुचे, ज्योती शेटे ,सविता गोतरकर,अपर्णा उमाळकर, वंदना जोशी,लता कुयरे, पुष्पलता सहस्त्रबुद्धे, नुपूर तोरणे, सुहास हर्डीकर, विद्या घाटे, स्वाती देशपांडे, नीलम पांढरीपांडे

### मागच्या ज्ञानांजलीतील प्रश्नावलीची उत्तरे!

१) गजानन महाराज २) मुंबई
३) कृष्णा पाटील ४) चंद्रभागा
५) सर्व्हेअर६) सोबणी
७) परशुराम ८) दासगणू महाराज
९) कोपरखळी मारून
१०) कुकाजीच्या वाड्यात

## भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव

वर्धमान महावीर, जैन धर्माचे २४वे आणि अंतिम तीर्थंकर! भारतीय परंपरेतील एक महत्त्वाचे संत आहेत. इ.स.पू. ६व्या शतकात बिहारमधील कुंडग्राम येथे राजघराण्यात जन्मलेले वर्धमान बालपणी वैभवात वाढले. ५९९ इ.स.पू. मध्ये त्यांचा जन्म झाला असे जैन परंपरा सांगते. त्यांचे नाव 'वर्धमान' म्हणजे समृद्धी सूचित करणारे आहे. त्यांच्या जन्मप्रसंगी इंद्रदेवतेने अभिषेक केल्याचे पुराणकथांमध्ये वर्णन आहे. लहानपणापासूनच ते करुणाशील होते. ३० व्या वर्षी, पालकांच्या मृत्यूनंतर त्यांनी राजवैभव त्यागून संन्यासाचा मार्ग स्वीकारला. पूर्वीचे तीर्थंकर पार्श्वनाथ यांनीही हाच वयाचा टप्पा निवडल्यामुळे हा एक शास्त्रसंगत निर्णय मानला जातो. बारा वर्षे त्यांनी तपश्चर्या, उपवास व कडक आत्मसंयमाने जीवन व्यतीत केले. ४३ व्या वर्षी शालवृक्षाखाली ध्यान करताना त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. तेव्हापासून ते 'जिन' अंतर्मनाच्या शत्रूंवर विजय मिळवलेले, आणि 'महावीर'; महान-वीर म्हणून ओळखले गेले. जैन आणि हिंदू धर्म हे दोघेही भारतात उद्भवलेले असून पुनर्जन्म, कर्म, मोक्ष या तत्त्वांत साम्य आहे. मात्र, जैन धर्म ईश्वर-संकल्पना नाकारतो. वेदप्रमाण्यता मानत नाही. जैन अहिंसा अधिक काटेकोरपणे पाळतो. आत्मा (हिंदू - आत्मा, जैन - जीव) यांच्या संकल्पनांत भिन्नता आहे. पाश्चिमात्य अभ्यासकांनी प्रारंभी जैन धर्माला हिंदू उपसंप्रदाय मानले. जसे कि जेम्स बर्जेस आणि मॅक्स म्यूलर यांनी जैन धर्माला उपप्रवृत्ती म्हणून पाहिले. मात्र आधुनिक संशोधनात जैन धर्म ही वेगळी श्रमण परंपरा आहे, हे मान्य केले जाते.

महावीरांच्या शिकवणीचा मुख्य आधार 'अहिंसा' आहे. सर्व जीवांबद्दल समभाव आणि अहिंसा हा त्यांच्या नीतीमूल्यांचं गाभा आहे. प्रत्येक प्राण्यात जीव असून त्याला सुख हवे असते, दुःख नको असते. या तर्कावर आधारित ही शिकवण आहे. म्हणूनच, हिंसा ही फक्त इतरांनाच नव्हे तर स्वतःलाही हानी पोहोचवते. या कारणास्तव जैन जीवनशैलीत शाकाहार, सूक्ष्मजीवांचेही संरक्षण, आणि अत्यंत सावधपणाचा आग्रह आहे. आजही ही शिकवण पर्यावरण, शाश्वतता, आणि पशुसंवर्धन यांसारख्या समकालीन विषयांशी सुसंगत ठरते.

पंचमहाव्रत सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह आणि आसक्ती हे सर्व तर्कशुद्ध आधारावर आहेत. खोटं बोलणे, चोरी, वासनेचा अधीनपणा आणि वस्तूंशी आसक्ती हे आत्म्याला बांधून ठेवणारे घटक आहेत. यावर विजय मिळवण्यासाठी संयम आवश्यक आहे. जैन धर्म निर्मिती, रक्षण किंवा संहार करणा?्या देवतेच्या संकल्पनेला नाकारतो. ब्रह्मांड हे स्वयंभू व नित्य आहे,



आणि कर्मसिद्धांतानुसार चालते असे ते मानतात. कर्म हे अतिसूक्ष्म पदार्थ (पुद्गल) म्हणून आत्म्याला चिकटते. यामुळे जन्म-मृत्यूचा फेर सुरू राहतो. याची प्रक्रिया आस्रव, बंध, संवर आणि निर्जरा या पाय?्यांतून स्पष्ट केली जाते. 'अनेकांतवाद' ही महत्त्वाची शिकवण आहे. सत्य बहुपर्यायी असते. परंतु, प्रत्येक दृष्टिकोनातून वेगवेगळे असू शकते. यामुळे बौद्धिक नम्रता, सहिष्णुता आणि विचारांची व्यापकता वाढते. 'स्याद्वाद' आणि 'नयवाद' या सिद्धांतांतून सापेक्षता तत्त्वाची पुढची व्याख्या होते. सप्तभंगी न्याय ही सात अंगांची तर्कपद्धती ही जैन विचारसरणीतील वैशिष्ट्य आहे.

**-टीम आकांक्षा**

## बंटीची बंडखोरी

**(भाग ४७)**

**प्रीती वडनेरकर** /९८२३९९४७९२

'बंटी ग्रुप, सिंहगड किल्ला पाहून, पुण्याहून परतला. 'छावा' चित्रपट पाहून साऱ्यांच्या मनात एक वेगळंच वारं संचारलं होतं. छत्रपती श्री शिवाजी महाराज आणि छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्याबद्दल अपार आदर, अभिमान आणि प्रेम दाटून आलं होतं. म्हणूनच त्यांचे गडकिल्ले, त्यांचा इतिहास जाणून घेऊन, त्यांना मानाचा मुजरा देण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

'बंटी, सिंहगड व्यवस्थित पाहिला नं? कसं वाटलं?' बाबांनी विचारलं. 'ग्रेट...एकदम भारी! म्हणजे इतिहास माहीत होताच पण, प्रत्यक्ष बघताना, तानाजी मालुसरेंचं शौर्य आणि बलिदान ऐकताना, अंगावर अक्षरशः शहारे येत होते,' बंटीनं सांगितलं.

'तुला माहित आहे, संपूर्ण भारतात असे अकराशे गडकिल्ले आहेत. सर्वांची आगळी ओळख आणि वेगळं महत्व आहे. त्यापैकी साडेतीनशे गडकिल्ले, एकट्या महाराष्ट्रात आहेत,' बाबा म्हणाले.

'बापरे... आणि प्रत्येकाचं ऐतिहासिक महत्व आहे? बाबा, इतके गडकिल्ले पहायला किती दिवस लागतील,' बंटीनं शंका काढली. 'नाही रे बंटी, इतके गडकिल्ले नाही पालथे घालायचे. त्यातले काही महत्वाचे पाहता येतील.' बाबांचं बोलणं मधेच थांबवत आई म्हणाली,'आता कोल्हापूरला जाऊन, पन्हाळगड आणि प्रतापगड पाहता येतील. बंटी, आम्ही सुद्धा येतोय तुमच्या बरोबर! अनायसे आम्हा दोघांनाही सुट्या आहेत. कुठल्या तरी हील स्टेशनवर जाऊन राहण्यापेक्षा, गडकिल्ले पाहण्यात जास्त स्वारस्य आहे आम्हाला!'

'कोल्हापूरला राहण्याची सोय कुठे होणार? पुण्यात दादामामा आणि मामींनी खूप मदत केली आम्हाला! तसं कोल्हापूरला कोण असेल?' बंटीनं विचारलं. 'बंटी, हल्ली 'होम स्टे' हा प्रकार निघाला आहे. ज्यांच्याकडे मोठी घरं, भरपूर खोल्या असतात, घरात एक-दोनच माणसं असतात, त्यांच्याकडे प्रवाशांच्या राहण्याची, जेवण्याची सोय असते. त्यामुळे घरचं खायला मिळतं आणि हॉटेलसारख्या सोयीसुविधाही मिळतात. आपलं रेल्वेचं रिझर्वेशन आलं की, होम स्टेसाठी बुकींग करून टाकतो,' बाबांनी नवी माहिती दिली.

'हो चालेल बाबा,' बंटीला कल्पना आवडली.'हो...आणि मी फराळाचे पदार्थ, चिवडा, लाडू, शेव, चकली, सारं बनवून घेते.' रेल्वे रिझर्वेशन, होम स्टे बुकींग, सारं व्यवस्थित पार पाडल्यावर, बंटी ग्रुप आणि त्याच्या आईबाबांच्या स्वाऱ्या कोल्हापूर मुक्कामी डेरेदाखल झाल्या. होम स्टेमध्ये उत्तम व्यवस्था, घरच्यासारखं खाणं, चहा, नाश्ता होता. आठ सीटर गाडीची सोय झाल्यामुळे, सगळ्यांच्या एकत्र गप्पा, हास्य विनोद होणं शक्य झालं होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता करून, स्वाऱ्या निघाल्या. अर्ध्या पाऊण तासात पन्हाळ्यावर पोहचलेसुद्धा! पन्हाळ्याच्या वाटेवर थेट किल्ल्याचा परिसर येईपर्यंत, दुतर्फा, घरं, बंगले बांधून, जनतेनं पन्हाळ्याला थेट गावातच आणलेलं दिसलं.

कारपार्किंग केल्यावर इथेही गाईडसाठी बरेच जण येऊन उभे राहिले. त्यातल्या एकाची निवड केल्यावर, पन्हाळ्याचा प्रवास सुरू झाला. 'पन्हाळा गड आणि किल्ला, त्याच्या मोक्याच्या स्थानामुळे कोकण आणि पठार यांच्यावर लक्ष ठेवायला अतिशय उपयुक्त होता. त्यामुळे याचा ताबा मिळवण्यासाठी मोगल आणि मराठे यांच्यांत बऱ्याच वेळा चकमकी झाल्या,' गाईड सांगत होता.

'पण, पन्हाळा म्हटलं की आठवतो, तो सिद्दी जोहरने घातलेला वेढा! महाराजांना, खरं तर, सिद्दी जोहरच्या तावडीतून सुटून, विशाल गड वर कूच करायचं होतं पण, त्याच्या वेढ्यामुळे शक्य होत नव्हतं. पण, शिवा काशीद आणि बाजीप्रभू देषपांडे यांच्या बलिदानामुळे, त्यांनी पावनखिंडीत मुगलांना थोपवून धरल्यामुळे, शिवाजी महाराज मोजक्या सैनिकांबरोबर विशाल गडावर सुखरूप पोहचले. हा इतिहास आठवतो,' बंटीनं सांगितलं.



'हो, हो...आम्हालाही माहीत आहे हा इतिहास,' बंटी ग्रुप कोरसमध्ये ओरडला. 'बरोबर मुलांनो, अगदी बरोबर! आपण जोपर्यंत चढत आहोत तोपर्यंत, त्याच्या आधीचा इतिहासही सांगतो. ऐका, हा किल्ला राजा भोज नृसिंह यानं बांधला. त्यानंतर, बिदरच्या सुलतानाच्या वजीरानं याचा ताबा मिळवला. विजापूरच्या आदिलशहाला, कोकणावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा किल्ला योग्य वाटला. त्यानं हा किल्ला जिंकून घेतला. नंतर, शिवाजी महाराजांना याचं महत्व वाटल्यामुळे त्यांनी हा किल्ला काबीज केला.

महाराजांचा मुक्काम या गडावर असतानाच, सिद्दी जोहरनं संपूर्ण किल्ल्याला वेढा घातला. कसंही करून, त्याला महाराजांची कोंडी करायची होती. गडावरची अन्नधान्याची कुमक संपुष्टात आली. सिद्दीचं सैन्य अफाट, तोफा आणि दारूगोळाही मुबलक! त्यामुळे महाराजांनी त्याच्याशी मुकाबला करण्याचं टाळलं. मात्र, महाराजांच्या गुप्तहेरांनी गुप्तमार्ग शोधून काढून, महाराज आणि मोजक्या सैनिकांना विशालगडावर पाठवलं. सिद्दीला ही बातमी कळली आणि त्यानं महाराजांचा पाठलाग करायला सुरूवात केली. त्यावेळी, बाजीप्रभू देशपांडे यांच्या अतुलनीय पराक्रमामुळे, सैन्याला थोपवून महाराजांना सुखरूप विशालगडावर पोहचवलं. शिवा काशीद याने महाराजांचे प्रतिरूप होऊन मृत्यूला कवटाळलं.'

'त्यावेळचे सैनिक, सरदार, किती स्वामीनिष्ठ आणि स्वतःच्या प्राणांची पर्वा न करणारे होते. याचं उत्तम उदाहरण म्हणजे, बाजीप्रभू देशपांडे आणि शिवा काशीद,' बंटी म्हणाला.

'मुलांनो, इथे थोडावेळ विश्रांती घेऊ या. गाईड दादा तुम्ही पण या, सगळेजण! कैरीचं पन्हं घेऊ या. थोडं फ्रेश होऊ या,' बंटीची आई म्हणाली. थोडी भेळ आणि पन्हं घेऊन सारे ताजेतवाने झाले.

'चलो ग्रुप... आता दुप्पट वेगानं पुढे जाऊ या. इतिहास समजला, आता किल्ला पाहू या,' बाबांनी म्हटल्यावर सारे कूच करायला सज्ज झाले. 'मुलांनो, आपण सुरूवातीला शिवा काशीदच्या समाधीजवळ आलो. त्यानंतर, हा बाजीप्रभू देशपांडे यांचा पुतळा!' गाईडनं सांगितलं. 'बाजीप्रभू, दोन्ही हातात, दोन तलवारी घेऊन, जिवाची बाजी लावून प्राणपणानं लढले. त्यांचं शिर कापल्यावरसुद्धा त्यांचं लढणं चालूच होतं. दोन्ही हातातल्या तलवारींनी ते कित्येक वेळ लढतच राहिले,' बाबांनी सांगितलं.

'हे एका पाठोपाठ एक असे तीन दरवाजे आहेत. शिवाय 'चार दरवाजा' आणि 'वाघ दरवाजा'ही गडाला आहे,' गाईड सांगत होता. 'ही... विहीर दिसते आहे,' बंटी म्हणाला.

'हो... हिला अंधार बावडी म्हणतात. ही तीन मजली विहीर संपूर्ण गडाला पाणी पुरवायला पुरेशी होती. ही काळ्या दगडांची तीन मजली वास्तू आहे आणि तळाला पाण्याची खोल विहीर आहे.'

'ही कोठारं दिसताहेत. अन्नधान्य साठवण्यासाठी कोठारं असतील,' स्वानंदं विचारलं.

'अगदी बरोबर! गंगा, यमुना आणि सरस्वती अशी तीन भली मोठी धान्य कोठारं आहेत. यात २५ हजार खंडी धान्य मावत असे,' गाईड सांगत होता. 'बापरे... त्यावेळी सारा राज्यकारभार किल्ल्यावरून चालत असायचा? त्यामुळे भरपूर प्रजाही इथेच राहत असणार. त्यांना पुरेसं अन्नधान्यंही लागत असणार,' आई म्हणाली.'पूर्वी इथे बालेकिल्ला होता. याच्या सभोवती खंदक आहे. इथेच दारूगोळ्यासाठी स्वतंत्र कोठारंही होती आणि नाण्यांची टांकसाळही होती,' गाईडनं विचारलं,'थोड्या पायऱ्या उतरून आपल्याला, शिवमंदिरात जायचंय का?''हो... का नाही, जाऊ यात.' सर्व जण एकदम एका सुरात उत्तरले. गाईडच्या पाठोपाठ पायऱ्या उतरून सारे मंदिरात जाऊन परत वर आले. 'इथे काही समाध्या बांधलेल्या दिसत आहेत. कोणाच्या आहेत?' बंटीनं विचारलं. 'गडावरचे अमात्य रामचंद्र पंत आणि त्यांच्या पत्नीची समाधी आहे. हा इथे अजून एक दरवाजा आहे, याचं नाव वाघ दरवाजा आहे आणि हा दुतोंडी बुरूज.''ही पायवाट कुठे जाते दादा?' बंटीनं पायवाटेकडे बोट दाखवून विचारलं. याच वाटेनं महाराज सिद्दी जोहरच्या वेढ्यातून निसटून विशाळगडला गेले. म्हणून हिला राजदिंडी असं नाव आहे. या इथे श्री शिवाजी महाराजांचं आणि श्री संभाजी महाराजांचं मंदिर आहे. त्यात महाराजांची संगमरवरी अश्वारूढ मूर्ती आहे. ते अंबाबाई मंदिर आणि ती पाराशर गुहा!''मंडळी आता आपण संपूर्ण पन्हाळ्याची माहिती घेतली. मला रजा द्या. तुम्हाला या बगिच्यात, विश्रांतीसाठी थांबता येईल,' असं म्हणून गाईड निघून गेला. बंटी ग्रुप आणि बंटीचे आईबाबा, तिथल्या बगिच्यात जाऊन जवळचं खाणं पिणं करून, आपल्या आठ सिटर गाडीकडे रवाना झाले. निःशब्द झालेल्या सगळ्यांच्या डोळ्यांसमोर, बाजीप्रभू देशपांडे यांचा अतुलनीय पराक्रम येत होता.

# जिल्ह्यातील मंडळ अध्यक्षांच्या निवडीबाबत मुंबईत भाजपची बैठक

## सहा नवीन मंडळाची निर्मिती, दोन दिवसांत निवडींची घोषणा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**

हिंगोली जिल्ह्यातील मंडळ अध्यक्षांच्या निवडीबाबत मुंबई येथे भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हिंगोलीतील भाजपच्या लोकप्रतिनिधी, संघटन मंत्री तसेच जिल्हाध्यक्ष, सरचिटणीस यांची दि १६ एप्रिल रोजी बैठक झाली आहे. विशेष म्हणजे यावेळी सहा नवीन मंडळांची निर्मिती केली असून जिल्ह्यात आता एकूण १३ मंडळ अध्यक्षांची निवड करण्यात येणार असल्याची माहीती जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांनी दिली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षात जोरदार हालचालींना सुरूवात झाली असून मंडळ अध्यक्षांच्या निवडीबाबत मुंबई येथे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली आहे. यावेळी मंत्री पंकजा मुंडे, संघटनमंत्री संजय कौडगे, माजी खासदार प्रितम मुंडे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी प्रदेश उपाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, मंडळ निवडणुक प्रभारी डॉ सुभाष कदम, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, खोबराजी नरवाडे, महिला जिल्हाध्यक्षा उज्वला तांभाळे, छाया मरडे, गोवर्धन वीरकुंवर आदींची उपस्थिती होती.

यावेळी आगामी निवडणुकांबाबत चर्चा करण्यात आली. याशिवाय बुथ बळकटीकरण करण्यावर भर देण्याच्या सुचना देण्यात आल्या. या बैठकीत जिल्ह्याचा वाढता व्याप लक्षात घेता सहा नवीन मंडळे स्थापन करण्यात आली असून यामध्ये वसमत पूर्व, आखाडा बाळापूर, सिरसम, जवळाबाजार, गोरेगाव, कळमनुरी शहर या मंडळांचा समावेश आहे. पूर्वीची सात मंडळे हिंगोली शहर, हिंगोली ग्रामीण, सेनगाव मंडळ, वसमत पश्चिम, कळमनुरी ग्रामीण, औंढा नागनाथ मंडळांचा समावेश आहे. तेरा मंडळांमध्ये आता अध्यक्षांच्या दोन दिवसात निवडी होणार असून यासाठी कोअर कमिटीच्या सदस्यांकडून मते जाणून घेतली जाणार आहेत. त्यानंतर जिल्हा स्तराव पक्ष निरीक्षक तेरा मंडळ अध्यक्षांची नावे घोषित करणार आहेत. एका मंडळाच्या अध्यक्षाकडे ३० ते १०० बुथ राहणार असून या मंडळाच्या अध्यक्षावर बुथची जबाबदारी दिली जाणार असल्याची माहीती जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांनी दिली आहे.

# सस्ती अदालतीच्या माध्यमातून पाणंद व शिवरस्त्यांचे प्रश्न सोडवा

## विभागीय आयुक्तांच्या जिल्हा प्रशासनाला सूचना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**

जिल्ह्यातील सर्वच पाणंद आणि शिवसस्ते व शेतरस्त्यांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दर पंधरा दिवसाला तालुकास्तरावर सस्ती अदालतीचे आयोजन करुन नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी संबंधित यंत्रणेला संवाद मराठवाड्याशी अभियानातील ऑनलाईन वेबिनारमध्ये दिले.

मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यायातील गरजू नागरिक आपल्या शेतातील जाण्या-येण्याच्या रस्त्याबाबत अडचणी जाणून घेण्यासाठी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गरजू नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त कार्यालयातून अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार, उपायुक्त (महसूल) खुशालसिंह परदेशी, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, शुभांगी आंधळे आणि मराठवाड्यातून निवासी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी आदी उपस्थित होते. संवाद मराठवाड्याशी या उपक्रमाच्या माध्यमातून सुरु झालेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये मराठवाड्यातील शेतकरी, नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'संवाद मराठवाड्याशी' या वेबिनारमधून नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी सुरुवातीला या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. उपायुक्त (महसूल) खुशालसिंह परदेशी खुशालसिंह परदेशी यांनी नागरिकांच्या अडचणी ऐकून शिवरस्ते, पाणंदरस्त्याची प्रकरणे निकाली काढण्यासाठीच हा उपक्रम हाती घेतला असल्याचे सांगितले.

यावेळी हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांनी शेतरस्ते, पाणंद रस्ते, शिवरस्ते मोकळे करुन देण्याची मागणी केली. त्यावर विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी विभागातील सर्व ७५ तालुक्याच्या ठिकाणी सस्ती अदालतीचे आयोजन करुन शिवरस्ते, पाणंद रस्ते, शेतरत्याचे प्रश्न सोडवण्यात येतील. यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सस्ती अदालतीचे आयोजन करुन प्रलंबित व नव्याने आलेल्या प्रकरणावर तातडीने निर्णय घ्यावेत आणि रस्त्याचे प्रश्न सोडविण्यासाठी गती द्यावी, असे सांगितले. तसेच त्यांनी मोकळे करण्यात आलेले रस्ते पक्के करण्यासाठी आमदार, खासदारांच्या सहकार्याने रस्त्याच्या मजबुतीची कामे करण्यात येतील, असे सांगितले. यावेळी अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांनी यापूर्वी दिलेल्या सूचनेनुसार व सस्ती अदालतीचे आयोजन करुन शेतरस्ते, पाणंद रस्त्याची शेतकरी, नागरिकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील, असे सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातून हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, तहसीलदार अश्विन माने उपस्थित होते.

# जिल्ह्याचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करू- राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**



केंद्र व राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणीतून जिल्ह्याचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करुयात, असे जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज आढावा बैठकीत सांगितले.

नूतन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज हिंगोली जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर जिल्हा नियोजन समिती सभागृहामध्ये सर्व विभाग प्रमुखाची आढावा बैठक घेतली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता म्हणाले, शासनाच्या महत्त्वपूर्ण विविध योजनांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. सर्व योजना राबविण्यासाठी सर्व विभाग प्रमुख यांच्याकडून चांगले काम होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.



**हिंगोली- शहरातील रिसाला बाजार भागात जिल्हा दिव्यांग पूर्नवसन केंद्राची सुसज्ज इमारतीचे काम मागील एक वर्षापासून पूर्ण झाले आहे. सदरील इमारत दिव्यांगांसाठी महत्वाची आहे मात्र अजूनही उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे. लवकरात लवकर इमारतीचे उद्घाटन करून दिव्यांगांना न्याय देण्याची मागणी दिव्यांग संधटनेकडून होत आहे. छाया- सुनील पाठक**


## संक्षिप्त वृत्त

### आडगाव येथील ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन



हिंगोली- तालुक्यातील आडगाव मुटकुळे येथील गट क्र ४३७ मध्ये अनेक वर्षापासून वास्तव्य करणाऱ्यांना तहसील प्रशासनाने अतिक्रमण काढण्याच्या नोटीसा बजावल्या आहेत. परंतु सदरील लोक हे मागावर्गीय असून अनेक वर्षापासून याठिकाणी वास्तव्यास आहेत. तसेच ग्रामपंचायतीकडे ते नळपट्टी, घरपट्टी भरत असून घरकुलही मंजूर करण्यात आले आहेत. ग्रामपंचायतीच्या सर्व सोयी सुविधांचा ते लाभ घेत आहेत. त्यामुळे सदरील कार्यवाही कशी काय करता असा सवाल करीत मागासवर्गीय गोरगरीबांचा विचार करून सदरीलक कार्यवाही थांबवावी असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. निवेदनावर वैजनाथ मुधळकर, भगवान रणबावळे, पापा खान पठाण, लक्ष्मण ढगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### सुरवाडीत ग्राम दरबाराला गावकऱ्यांचा प्रतिसाद



हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील सुरवाडी येथे एक दिवस गावकऱ्यांसोबत हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनामार्फत विविध विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचाव्या व प्रत्येक योजनेची माहिती नागरिकांना व्हावी, त्यांना त्या योजनेचा लाभ घेता यावा व त्यातून गावाचा विकास व्हावा यासाठी एक दिवस गावकऱ्यांसोबत हा नावीन्यपूर्ण उपक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली औंढा नागनाथ तालुक्यातील ग्रामपंचायत सुरवाडी या ठिकाणी १६ मार्च रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजीवकुमार कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे व सरपंच गयाबाई मुंजाजीराव टोम्पे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या वेळी विविध विभागांचे अधिकारी यांनी आपल्या विभागातील योजनांची माहिती जनसामान्यांना दिली व त्यांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या व सर्वसामान्यांचा समाधान करण्याचा प्रयत्न केला. यावेळी सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# भगवान परशुराम जयंती समितीच्या अध्यक्षपदी राघव खंडेलवाल, अभय जोशी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**



येथील गायत्री भवन येथे भगवान परशुराम जन्मोत्सव समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत समिती गठीत करण्यात आली आहे.

३०/४/२०२५ वार बुधवार रोजी परशुराम जयंती पूजन गायत्री भवन येथे साजरे करण्यात येणार आहे. तदनंतर सामाजिक व्यवस्थेसाठी ५ मे रविवार रोजी भव्य मिरवणूक व महाप्रसादाचे आयोजन गायत्री भवन येथे आरतीनंतर लगेचच करण्यात येणार आहे. या समितीच्या अध्यक्षपदासाठी आठ ते दहा नावे आल्यामुळे आल्यामुळे सकल ब्राह्मण समाज अंतर्गत परशुराम ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष दत्तराज प्रभाकरराव डोईफोडे यांनी त्यांच्या हाताने ईश्वर चिट्ठीचे नियोजन करून अध्यक्षांची निवड केली त्यामध्ये अध्यक्ष बहुभाषिक समाजातर्फे राघव खंडेलवाल व ब्राह्मण समाजातर्फे अभय प्रभाकरराव जोशी. उपाध्यक्ष म्हणून पवन उपाध्याय व संजय मेथेकर यांची निवड करण्यात आली. सचिव या पदावर रजनीश पुरोहित व नितीन शर्मा यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्ष म्हणून गोविंद खंडेलवाल (पहिलवान) व सुप्रसिद्ध व्यापारी आशिष शर्मा यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्ष व्यापारी संजय मानका व चार्टर्ड अकाउंटंट वकील व्यवसायातील पंकज जोशी यांची निवड करण्यात आली. व मार्गदर्शक सतीशराव विडोळकर यांची निवड करण्यात आली सदरील निर्वाचित कमिटी कडून सदरील कार्यक्रमास या बैठकीस अनिल खांडल, दिलीप शर्मा, सुरज व्यास, दिलीप शर्मा, धीरज शर्मा, मनोज शर्मा, अनिल शर्मा, जुगल खंडेलवाल, प्रदीप उपाध्याय प्रेम शर्मा, योगेश पांडे, योगेश घन, राकेश भट्ट यांच्यासह मोठ्या संख्येने बहुभाषिक ब्राम्हण व सकल ब्राम्हण समाजातील बांधव उपस्थित होते.

# आखाडा बाळापूरात महिलेच्या गळ्यातील गंठण पळविले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**

आखाडा बाळापूर येथे मुलीस शाळेत सोडून आल्यानंतर गल्लीमध्ये एका महिलेस बोलत असतांना दुचाकीवर आलेल्या दोन भामट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील गंठण पळविल्याची घटना दि १७ एप्रिल रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे. आखाडा बाळापूर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजवरून भामट्यांचा शोध सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार आखाडा बाळापूर येथील भाग्यश्री पिंपरवार यांचे नाकाडे गल्लीमध्ये घर आहे. आज सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्या दुचाकी वाहनावर मुलीस शाळेत सोडण्यासाठी गेल्या होत्या. त्यानंतर घरी परत आल्या. यावेळी गल्लीमध्ये एक महिलेशी गप्पा मारीत उभ्या असतांना दुचाकीवर दोन भामटे आले. त्यांनी काही कळण्याच्या आतच भाग्यश्री यांच्या गळ्यातील गंठण हिसकावून पळ काढला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे भाग्यश्री ह्या घाबरून गेल्या. त्यांनी आरडाओरड केली मात्र तोपर्यंत भामटे पसार झाले.

दुचाकीवर आलेले भामटे लाल रंगाच्या पल्सर गाडीवर आले होते. त्यापैकी पाठीमागे बसलेल्या भामट्याने तोंडाला रूमाल बांधला होता तर दुचाकी चालविणारा भामटा रंगाने काळासावळा असल्याचे सांगण्यात आले. या घटनेची माहीती मिळताच आखाडाबाळापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे, उपनिरीक्षक गणेश घोटके, जमादार शिवाजी पवार, शेख अन्सार, राजीव जाधव, रामदास ग्यादलवाड यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी आखाडा बाळापूर हद्दीत नाकाबंदी करून दुचाकीचा शोध सुरू केला होता. मात्र भामटे हाती लागले नाही. या प्रकरणी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरूआहे. पोलिसांनी आता या मार्गावर असलेल्या दुकानाबाहेरील सीसीटीव्ही फुटेज पाहून भामट्यांची ओळख पटविण्याचा प्रयत्न चालविला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# वसमतमध्ये काँग्रेसची आढावा बैठक



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १७ एप्रिल**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे आदेशान्वये नेमलेले निरीक्षक कल्याण दळे यांच्या मार्गदर्शनाखाली वसमत येथे तालुका व शहर काँग्रेस कमिटीचे आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये अध्यक्षपदी डॉ क्यातमवार तर, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रभारी ॲड सचिन नाईक, सहप्रभारी डॉ श्रावण रायफलवाड, माजी नगराध्यक्ष तथा प्रदेश सरचिटणीस अब्दुल हाफिज अब्दुल रहमान, जिल्हा समन्वयक विनायकराव देशमुख यांच्यासह वसमतची माजी, महिला प्रदेश सचिव ॲड. सीमा हाफिज, उपनगराध्यक्ष रियाजुद्दीन कुरेशी, जिल्हा उपाध्याय शंकरराव कऱ्हाळे, युवकचे साईनाथ जाधव, नगरसेवक रविकिरण वाघमारे, नगरसेवक नदीम सौदागर, अब्दुल तोहीद, आमन पठाण, डॉ नजीब शेख, प्रा. देवकत्ते, नसीर कुरेशी, बब्बलू शेख, नागेश सोनटक्के, वसिम बागवान,इरफान बाले, हमीद क्युरेशी, आबा कदम, बदर चाऊस, शेख नईम, संजय भोसले, सैफु पठाण, शेख अहमद, प्रशांत मुदणर, विजय कुरुडे, मंगला गजभारे, अलीम बागवान, आशाताई गायकवाड, हे उपस्थित होते.

यावेळी निरीक्षक कल्याण दळे यांनी सांगितले की सर्वसामान्य कार्यकर्त्यांना आता तालुकाध्यक्ष शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे तसेच पक्षासोबत वर्षानुवर्ष राहिलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना पक्ष संधी देण्याच्या तयारीत आहे. यावेळी प्रस्ताविक तालुकाध्यक्ष राजाराम खराटे यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड ऋषिकेश देशमुख यांनी केले व आभार प्रदर्शन शहराध्यक्ष शेख अलीमोद्दीन यांनी मानले.

# सोनीया गांधी, राहुल गांधी यांच्यावरील कार्यवाहीचा निषेध



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**

प्रवर्तन संचनालय कडून नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात काँग्रेस पक्षाच्या नेत्या सोनीया गांधी आणि विरोधी पक्षनेते खा राहुल गांधी तसेच इतर काँग्रेसच्या नेत्यांवर मालमत्ता जप्ती आणि आरोप पत्र दाखल करण्याच्या कार्यवाहीचा हिंगोली काँग्रेसकडून जाहीर निषेध करीत सदरील कार्यवाही ही राजकीय सुडबुध्दी आणि अलोकशाही पध्दतीची असल्याचा आरोप करीत केंद्र सरकार व ईडी विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी आ. डॉ प्रज्ञा सातव, पक्ष निरीक्षक कल्याण दळे, जिल्हा प्रभारी ॲड सचिन नाईक, अनिल नैनवाणी, अब्दुल हाफीज, विनायक देशमुख, सुरेशअप्पा सराफ, आबेद जहागीरदार, प्रशांत बाहेती, हमीद कुरेशी, बंटी नागरे, विलास गोरे आदींची उपस्थिती होती.

# पाणीपुरी खाल्ल्याने विद्यार्थ्यांना विषबाधा



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१७ एप्रिल-**

काल रात्री पाणीपुरी खाल्याने विष्णूपुरी भागातील ३० ते ३५ जणांना विषबाधा झाल्यानंतर या सर्वांना शासकीय रुग्णालयात व काहींना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या सर्वांची प्रकृती धोक्याच्या बाहेर आहे.

काल रात्री स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि विष्णूपुरी परिसरातील नर्सिंग कॉलेजच्या ३० ते ३५ विद्यार्थ्यांनी विष्णूपुरी परिसरातील एका पाणीपुरी चालकाकडून पाणीपुरी खाली. त्यानंतर दोन तासात सर्वांना उलट्या, मळमळ होऊ लागली. त्यामुळे विद्यार्थी घाबरले. यातील बहुतांश विद्यार्थ्यांना रात्रीच शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. शासकीय रुग्णालयात ३१ विद्यार्थ्यांना तर उर्वरित चार विद्यार्थ्यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक विजयकुमार कापसे यांनी दिलेल्या माहितीनुसार या सर्वांवर उपचार करण्यात आले. त्यातील काहींना आज सकाळी सोडून देण्यात आले तर काहींना दक्षता म्हणून रुग्णालयात दाखल करण्यात आले. या सर्वांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय अधीक्षकांनी सांगितले. दरम्यान सदरचा पाणीपुरी चालक कोण याचा शोध ग्रामीण पोलीस ठाणे घेत असून, सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. खाजगी रुग्णालयात ज्यांच्यावर उपचार सुरु आहेत त्यांचीही प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात आले.

# पंतप्रधानांच्या आवाहनानुसार खा. डॉ. अजित गोपछडे यांचा भारतीय सीमेवरील गावांत मुक्काम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१७ एप्रिल-**

भारत-बांगलादेश , भारत पाकिस्तान सीमेवरील गावात जाऊन खासदारांनी निवास करून तेथील नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करावा. विकासाच्या नव्या पर्वाला सुरुवात करावी असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. पंतप्रधानांच्या आवाहनानुसार भारतीय जनता पार्टीचे राज्यसभा सदस्य , खा. डॉ. अजित गोपछडे यांनी सीमेवरील गावात जाऊन निवास केला. त्या गावातील मूलभूत सुविधांसह नागरिकांच्या सुखदुःखाची त्यांनी माहिती जाणून घेतली .

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील सर्वच भागांमध्ये विकास पोहोचवला जात आहे. मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत . याशिवाय बांगलादेश आणि पाकिस्तान सीमेवर असलेल्या गावांमधील नागरिकांमध्ये विश्वासाचे आणि नवचैतन्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या खासदारांनी त्या गावात मुक्काम करून तेथील नागरिकांशी हितगुज करावे. त्यांच्या अडीअडचणी समजून घ्याव्यात आणि त्या अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाला सूचना करून तेथील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. या आवाहनानुसार खा. डॉ.अजित गोपछडे यांनी बांगलादेश सीमेवरील मावलिनॉन्ग आणि डावकी या मेघालय राज्याच्या राजधानी शिलाँग पासून शंभर किलोमीटर अंतरावर असलेल्या गावास त्यांनी भेट देऊन निवासी मुक्काम केला. सुरक्षा दलासोबत गावातील नागरिकांशी संवाद साधून त्यांचे मनोबल वाढवले . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टीचे केंद्र सरकार आपल्या पाठीशी कायम असल्यामुळे मनामध्ये कोणतीही भीती बाळगू नये. निश्चितपणे प्रत्येक गावात प्रत्येक गोष्टीची पूर्तता केली जाईल असा विश्वास खा. डॉ . गोपछडे



यांनी दिला आहे . बांगलादेशच्या सीमेवरील भारतीय गावात जाऊन तेथील ग्रामीण जीवनाशी खा. डॉ. अजित गोपछडे समरस झाले. तेथील बालकांसोबत फूटबॉल खेळणे, माता, भगिनी, मुले, सामान्य तरुण आणि जेष्ठ नागरिक तसेच सीमासुरक्षा दलाचे जवान यांच्या सोबत हितगुज केले. भारत सरकार द्वारे देशाची सीमा सुरक्षित करण्यासाठी लावण्यात आलेले मजबूत काटेरी कुंपन किती सहाय्यक होत आहे याबाबत जवानांनी त्यांना महत्त्व सांगितले. खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आशियातील सर्वात स्वच्छ गांव मेघालयातील मावलिनॉन्ग येथील स्वच्छता तंत्र समजून घेतले आणि तेथून प्रेरणा घेऊन सर्वांना आवाहन केले.

## गोविंदराव बोदमवाड यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१७ एप्रिल-**



मुदखेड तालुक्यातील मेंडका येथील रहिवासी गोविंदराव कोंडीबा बोदमवाड यांचे आज दि. १७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय अंदाजे ७५ वर्षे होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, चार नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे सुपुत्र प्रकाश बोदमवाड हे सध्या किनवट पोलिस ठाण्यात कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या निधनाने बोदमवाड कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून, गावातही हळहळ व्यक्त केली जात आहे. अंतिम संस्कार मेंडका येथे करण्यात येणार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

## सरकारच्या विरोधात काँग्रेसचे जोरदार निदर्शने



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१७ एप्रिल-**

भाजपा सरकारच्या विरोधात निर्भिडपणे उभे राहणाऱ्या काँग्रेस नेत्यांच्या विरोधात सुडबुद्धीने सरकार वागत आहे. यातूनच नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी व लोकसभेचे विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांच्या विरोधात ईडी मार्फत कार्यवाही केली आहे. असा आरोप करत नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवार (ता.१७) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयापुढे निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी केंद्रातील सरकार राजकीय सूडबुद्धीने नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी व लोकसभेचे विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधींसह इतर जेष्ठ नेते मंडळी विरोधात ईडी मार्फत कारवाई केली जात आहे. ही राजकीय द्वेषपुर्ण कारवाई आहे, असे सांगत नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयापुढे मोदी सरकारचा निषेध करण्यात आला. यावेळी उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष बी.आर. कदम, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, ज्येष्ठ नेते इश्वरराव भोसिकर, डॉ. श्रावण रँपनवाड, अँड. सुरेंद्र घोडसकर, केदार पाटील साळुखे, राजेश पावडे, महेश देशमुख तरोडेकर, आनंद चव्हाण, बालाजी चव्हाण, अनिल मोरे, मसुद खान, शमिम अब्दुला, प्रफुल्ल सावंत, अब्दुल गफार, रहीम खान, अजिज कुरेशी, सुरेश हटकर, गंगाधर सोंडारे, गंगाधर सोनकांबळे, सत्यपाल सावंत, गोविंद बाबा गोंड, डॉ. रेखा चव्हाण, डॉ. करुणा जमदाडे, शंकर शिंदे, बापूसाहेब पाटील, गणेश पाटील, मुन्ना अब्बास, माधव पवळे दिपकसिंग हजुरीया, गगन यादव, संजय वाघमारे, महेश शिंदे, अनिल कांबळे, बाबूराव पांडागळे, रफिक पठाण, प्रसेनजित वाघमारे, नुर मामु, जेशिका शिंदे, नसिम पठाण, धनंजय उमरीकर, गोविंद पाटील, अंबादास राताळे, गणेश पाटील, प्रथमेश गिरी, श्याम पाटील मनाटकर, आदी उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त



## शिरड ग्रा. पं. मध्ये ग्रामदरबार व मोफत आरोग्य शिबिर

**निवघा**-येथून जवळच असलेल्या मौजे शिरड येथे ग्रामदरबार सभा घेण्यात आली. यावेळी तालुक्यातील विविध विभागातील अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना विविध शासकीय योजनांची माहिती दिली. तसेच प्रशासकीय कामात येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच यावेळी आरोग्य विभागाच्या वतिने ५० नागरिकांची मोफत आरोग्य तपासणीही करण्यात आली. आरोग्य विभागाकडून मोफत तपासनी करून त्यांना औषधांचे वाटप करण्यात आले. यावेळी तालूक्यातील पं.स. विभाग, आरोग्य विभाग, कृषी विभाग, शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, पशु संवर्धन, समाज कल्याण, पाणीपुरवठा, स्वच्छता विभाग, सिंचन, जलसंधारण, महिला बचतगटासह तालुक्यातील सर्वच विभागातील अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना पशुधनाच्या आहार व आरोग्याची काळजी कशी घ्यायची यासह विविध योजनांची अधिकाऱ्यांकडून माहिती देण्यात आली
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शरद चौरे होते. यावेळी हदगावचे विस्तार अधिकारी पवार, कृषी विस्तार अधिकारी सुर्यवंशी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मुरमुरे,अंगणवाडी प्रवेशिका वानखेडे मॅडम महिला व अंगणवाडी कर्मचारी का बालकल्याण विभागाच्या अधिकारी मुदखेडे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. जयस्वाल, ए.पी. ओ. सुर्यवंशी, घंटेवाड, हिरप, ग्रामविकास अधिकारी राहूल गिरबिडे, माजी सरपंच संजय कल्याणकर माजी उपसरपंच बाबाराव बोरकर पत्रकार महेश बोरकर चेअरमन दादाराव ठाकरे अशोक शुरोशे राघो जाधव प्रेमानंद पाटील पुंजाराम गुंजकर बालाजी ठाकरे गजानन महाजन प्रकाश भांडवले वसंत जाधव अंकुश कल्याणकर अविनाश काकडे बाळू हिंगाडे विश्वनाथ कल्याणकर महीला व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## विष्णुपुरी शासकीय रुग्णालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**नवीन नांदेड**-महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा नांदेडच्या वतीने शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथील शासकीय सेवेतील कर्मचारी परिचारीका,ब्रदर्स यांच्या महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा नांदेडच्या वतीने दिनांक १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी या जयंती महोत्सवाच्या अध्यक्षा अल्का जाधव अधिसेविका ह्या होत्या तर या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रतिभा वाघदरीकर हे होते.तर प्रमुख उपस्थिती संघटनेचे पदाधिकारी वर्ग, तसेच उत्सव समितीचे पदाधिकारी वर्ग, सर्व इन्चार्ग सिस्टर आणि सर्व परिचारिका वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमांची सुरुवात दीप प्रज्वळीत करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले, त्या वेळीउपस्थित मान्यवरांना रुमाल देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज हणवते यांनी केलं. तर कार्यक्रमाचे स्वागत गीत मेघा सरपाते स्वाती इंगळे यांनी केले.सदरील कार्यक्रमात स्नेहा भालेराव,फहीम शेख,केशव जिंकलवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.आभार प्रदर्शन प्रतिभा वाघदरीकर यांनी मानले.

## स्मार्ट वद्युत मीटरच्या विरोधात काँग्रेसचा एल्गार

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.१७ एप्रिल-**

महावितरण कंपनीच्या वतीने शहरात बसविण्यात येत असलेल्या स्मार्ट विद्युत मीटरच्या विरोधात शहर तसेच युवक काँग्रेसच्या वतीने यलगार पुकारण्यात आला आहे. महावितरण कंपनीच्या अधिकारायांना निवेदन देऊन तातडीने स्मार्ट मीटर बसविणे थांबविण्यात यावे अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात उपस्थित करण्यात आलेल्या तारांकित प्रश्नांना उत्तर देताना राज्यात महावितरण कंपनीच्या माध्यमातून बसविण्यात येणारे मीटर थांबविण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी दिले होते. परंतु संबंधित विभाग आदेशाचे व सूचनाचे पालन करत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याविरोधात शहर व युवक काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

महावितरण कंपनीने शहरात स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न केला तर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल या आशयाचे लेखी निवेदन महावितरण कंपनीचे उपकार्यकारी



अभियंता लक्ष्मीन शिंदे तसेच सहाय्यक अभियंता यांना देण्यात आले आहे.

या निवेदनावर काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष कैलास गोडसे, माजी नगराध्यक्ष राज बहादूर कोत्तावर, माजी उपनगराध्यक्ष करीम खान साब, काँग्रेस कॉमेटी चे जिल्हा सचिव गिरीश कोत्तावर, जिल्हा उपाध्यक्ष राजू चौदंते, कार्याध्यक्ष मोहमद गौस, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष तौफिक पठाण, युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण, उपाध्यक्ष दादाराव पुयड नागेलीकर, सरपंच प्रतिनिधी साहेबराव गोरखवाड, अनुसूचित जाती शहराध्यक्ष ऋषिकेश चौदंते, अल्पसंख्याक शहराध्यक्ष इक्बाल कुरेशी, युवक काँग्रेस सचिव अतिक अहेमद, आकाश सोनटक्के, युवाक काँग्रेस उपाध्यक्ष अविनाश चौदंते, शिवाजी पाटील सूर्यवंशी, सुभाष चौदंते, वेदांत शेवटे, लतीफ टेलर, मल्लेवार यांच्यासह आदि कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## व्हि.आय.पी.रोडवरील महर्षी वाल्मीकी चौक नाम फलक हटवू नये

### कोळी समाज संघटनेची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१७ एप्रिल-**

व्हीआयपी रोड वरील रस्ता क्र.२६ माता गुजरिजी विसावा उद्यानालगत असलेल्या गेल्या १५ वर्षापासून आद्य कवी, रामायन ग्रंथाचे रचनाकार महर्षि वाल्मिकी ऋषी चौक नामफलक आहे. मनपा नांदेड प्रशासनाने विकास कामाअंतर्गत सुरक्षा भिंतीच्या पिल्लरसाठी खड्डे केलेले आहे. तरी आद्य कवी महर्षि वाल्मिकी ऋषी चौक यांच्या नावे असलेल्या नामफलकाला हानी पोहोचू नये व विटंबना होईल असे कृत्य होवू नये, संबंधीत परिसरामध्ये मनपा प्रशासनाला विकास कामे करण्यासाठी बाजूला भरपूर जागा असतांना सुद्धा हीच जागा का नेमण्यात आली. आद्य कवी महर्षि वाल्मिकी ऋषी चौक हे नामफलक कोळी समाजाच्या आस्मीयतेचा प्रश्न असून समाज बांधवांच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न करू नये अशा आशयाचे निवेदन अखिल भारतीय कोळी समाज संघटना नवी दिल्ली शाखा नांदेड जिल्ह्याच्यावतीने नांदेड जिल्हाध्यक्ष मा.श्री. गजानन रामकिशन इरलेवाड यांच्या नेतृत्वाखाली कोळी समाज बांधव शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालय, नगर पालीका प्रशासन विभागाच्या जिल्हा सह आयुक्त मा.श्री.गंगाधर इरलोड व मनपा आयुक्त नांदेड, जिल्हा पोलीस अधिक्षक नांदेड यांना या संदर्भाने निवेदन देण्यात आले.

या शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष गजानन इरलेवाड, गंगाधर जुक्कूलवार, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, ड.राजकुमार जाधव, मसाजी इरलेवाड, अमोल मालेगांवकर इत्यादींचा समावेश होता.

## भारतीय राज्यघटना सामाजिक लोकशाहीचा पाया : डॉ. सुरेंद्र जोंधळे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१७ एप्रिल-**

'आपल्या अवतीभवतीचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वास्तव खूप अस्वस्थ आहे. विशेषतःकोरोनानंतर शिक्षण, आरोग्य इत्यादी प्रश्न अधिक गंभीर झाले आहेत. समाजकारण, अर्थकारण आणि अस्मितेचे राजकारणही बदलले आहे. हिंसा, भेदभाव, द्वेष, शोषण, अन्याय, बहिष्कृतता, अधिकारशाही, संघर्ष, विस्थापन, प्रभुत्व, दारिद्र्य अशा अनेक गोष्टी आज आपल्याला दिसतात एका अर्थाने आपण सगळेच असमान जगात राहत आहोत. अजूनही मुलगामी समानता निर्माण झालेली नाही. म्हणून सामाजिक न्यायाचा मुद्दा खूप महत्त्वाचा ठरतो. त्याअर्थाने भारतीय राज्घटना सामाजिक लोक शाहीचा पाया आहे.' असे प्रतिपादन ख्यातनाम राजकीय विश्लेषक आणि मुंबई विद्यापीठातील निवृत्त प्राध्यापक डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी केले.

ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र आणि प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी यांच्या संयुक्त



विद्यमाने आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सव समारोपाच्या निमित्ताने आयोजित 'सामाजिक न्याय आणि भारतीय संविधान' या विषयावरील व्याख्यानामध्ये बोलत होते. व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. यावेळी अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. पी. विठ्ठल, उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे, अनुपम सोनाळे, प्रकाश तारू यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. सुरेंद्र जोंधळे म्हणाले सत्तर-ऐंशीच्या दशकात सामाजिक प्रश्नांसाठी आंदोलने होत असत. ती आता दिसत नाहीत. अल्पभूधारक माणूस शहरात स्थलांतरित होतो आणि तिथे तो असंघटित कामगार म्हणून काम करतो. खरं तर तो चांगल्या जीवनमानासाठी ग्रामीण भागातून स्थलांतरित होत असतो. असंघटित कामगार हा शहराचा प्राणवायू असतो. यासंदर्भातही सामाजिक न्याय महत्त्वाचा ठरतो. भारतीय राज्यघटनेची सर्वोच्च ताकद म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद होय. आपल्या जगण्याचा गाभा भारतीय संविधानातील विविध तरतुदीत आहे.

अध्यक्षीय समारोप करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी जयंती महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित विविध कार्यक्रमातबाबत समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमात जयंती महोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे पुरस्कार वितरणही करण्यात आले. प्रारंभी सर्व मान्यवरांनी महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. डॉ. हर्षवर्धन दवणे, मनोहर सोनकांबळे, जयवर्धन गच्चे, शामल भालेराव यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी केले तर आभार डॉ. हर्षवर्धन दवणे यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा. बालाजी कोंपलवार, डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. मल्लिकार्जुन करजगी, डॉ. आदिनाथ इंगोले, डॉ. राजेश शिंदे, डॉ. रावणगावकर यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापकांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

## कुंडलवाडीत आयुष्यमान आरोग्य शिबिर

**तभा वृतसेवा**
**कुंडलवाडी, दि.१७ एप्रिल-**

आयुष्यमान भारत योजने अंतर्गत हेल्थ अँड वेलनेस सेंटरची सात वर्ष पूर्ण झाल्या बद्दल त्या अनुषगांने आयुष्यमान आरोग्य मंदिरात आयुष्यमान आरोग्य शिबीर घेण्यात आले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४ एप्रिल २०१८रोजी आयुष्यमान भारत योजने अंतर्गत हेल्थ अँड वेलनेस सेंटरची सुरवात केली होती त्याचें औचीत्य साधून हे शिबिर घेण्यात आले.या शिबिरात ७२ रुग्णांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

या वेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणपती वाडेकर, गणेश बनसोडे, नागरी आरोग्य केंद्राचे वैदयकीय अधिकारी डॉ. तानाजी सुर्यवंशी तसेच कर्मचारी उषा जवंजाळ, शशिकांत भालेराव, हुसैनखा हन्नुखा पठाण आदी उपस्थित होते.

# चिंचोलीमाळी येथे संत नामदेव महाराज यात्रा महोत्सवाचे भव्य दिव्य आयोजन

## अखंड हरिनाम सप्ताह व शिव पुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१७ एप्रिल**

केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी ग्रामदैवत श्री. संत नामदेव महाराज यांच्या यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने १३ एप्रिलपासून अखंड हरिनाम सप्ताह, शिव पुराण कथा ज्ञानयज्ञ भव्य दिव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामदैवत श्री. संत नामदेव महाराज यांच्या यात्रा महोत्सवानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध तबलावादक तबला विशारद ह.भ.प. महादेव महाराज सगळे आळंदीकर, यांच्या मार्गदर्शनाखाली व ह.भ.प. संजय महाराज नखाते, ह .भ.प.आबा महाराज



मेहरकर, ह.भ.प. रविकुमार गायकवाड, ह.भ.प. पंढरीनाथ काळे, ह.भ.प. अविनाश नखाते यांच्या सुंदर नियोजनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व शिव पुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास प्रारंभ झाला आहे.

शिव पुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.पांडुरंग महाराज शिंपले यांच्या अमृत तुल्य वाणीतून व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध तबलावादक तबला विशारद ह.भ.प. महादेव महाराज सगळे आळंदीकर, ह.भ.प.आकाश महाराज पांचाळ, व सिन्थेसायझर ह.भ.प. गोपाळ महाराज नागरगोजे, पॅड ह.भ.प.नितीन महाराज मस्के यांच्या साथ संगतीने सुमधुर कथा श्रवण करण्यास मिळणार आहे.

दि. १३ एप्रिल रोजी ह.भ.प.ह.भ.प.पांडुरंग महाराज शिंपले यांचे, दि. १४ एप्रिल रोजी ह.भ.प. प्रेम मुर्ती समाधान महाराज शर्मा यांचे, दि. १५ एप्रिल रोजी ह.भ.प. दत्ता महाराज तांदुळवाडीकर यांचे, दि. १६ एप्रिल रोजी ह.भ.प. आप्पा महाराज जावळे हाळदगावर यांचे संपन्न झाले आहेत तर, दि. १७ एप्रिल रोजी ह.भ.प. नामदेव महाराज रेंगे परभणी यांचे, तर दि. १८ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत भारुड रत्न विष्णु महाराज बांडे यांचा सोंगी भारुडाचा कार्यक्रम होईल. व ह.भ.प. राजेंद्र महाराज सदगीर अकोले यांचे, दि. १९ ह.भ.प. शिवाजी महाराज बावस्कर गाडेगांव यांचे कीर्तन होणार आहे. व दि. २० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता भागवताचार्य ह.भ.प. गाथा मुर्ती उमेश महाराज दशरथे यांचे काल्याचे अमृत तुल्य कीर्तन होणार असून त्यानंतर भाविकांना महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. याच दिवशी रात्री ७ वाजता गावातून पालखी मिरवणूक व दिंडी प्रदक्षिणा झाल्यानंतर सोहळ्याची सांगता होणार आहे. या सोहळ्यास उपस्थित राहून भाविकांनी या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक ह.भ.प. संजय महाराज नखाते, ह .भ.प.आबा महाराज मेहरकर, ह.भ.प. रविकुमार गायकवाड, ह.भ.प. पंढरीनाथ काळे, ह.भ.प. अविनाश नखाते, विजय माने, शरद नखाते, अमर नखाते, कैलास गायकवाड, पंकज काळे, रामराजे गलांडे यांच्यासह ग्रामस्थ व तरुण मंडळ यांनी केले आहे.

मंगळवार दि. १९ एप्रिल रोजी गाड्या ओढण्याचा कार्यक्रम व याच दिवशी श्री. संत नामदेव महाराज यांची यात्रा भरणार असून या निमित्ताने दुपारी १२ वाजता भाविकांनी भरलेल्या १२ बैलगाड्या ओढण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावर्षी मोठ्या उत्साहात यात्रा महोत्सव साजरा करण्यात येणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा उत्सव समितीने केले आहे.

# पुराला कारणीभूत ठरणारे सरस्वती नदीवरील शॉपिंग कॉम्प्लेक्स काढून टाकण्यात यावे - अश्विन मोगरकर



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ एप्रिल**

अंबेवेस भागातील सरस्वती नदीतील शॉपिंग कॉम्प्लेक्समुळे पावसाळ्यात गावभागाला पुराचा धोका निर्माण होतो. हा धोका टाळण्यासाठी सरस्वती नदीत बांधण्यात आलेले शॉपिंग कॉम्प्लेक्स काढून टाकण्यात यावे अशी मागणी भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

परळी वैजनाथ गावभागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीवर अकरा वर्षांपूर्वी नगरपरिषदेच्या माध्यमातून या सरस्वती नदीला नाला ठरवत यावर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधकाम सुरू करण्यात आले. नदीवर कुठलेही बांधकाम करायचे असेल तर परवानगी मिळत नसल्याने शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी या पवित्र सरस्वती नदीला नाला ठरवण्याचे पाप केले गेल्याचा आरोप अश्विन मोगरकर यांनी केला आहे.

नागरिकांनी विरोध केल्याने या शॉपिंग कॉम्प्लेक्सचे काम बंद पडले आहे. मागील अकरा वर्षांपासून उभारलेल्या या बांधकामामुळे अनेक वेळा याच्या पिलरला कचरा अडकून लोकांच्या घरात पाणी घुसले आहे. अंबेवेस परिसरात यामुळे नदीत कचरा साचल्याने दुर्गंधी पसरत आहे तसेच डासांचाही त्रास वाढला आहे.अकरा वर्षांनंतर पाण्यात उभे असलेले हे बांधकाम कमकुवत सुद्धा झाले असेल पावसाळ्यातील मोठ्या पुरामुळे ते पडण्याची शक्यता आहे. या बांधकामाचा आधार घेत नदीत अतिक्रमण सुद्धा वाढत आहेत. परळी शहरातील जुन्या गावभागातून पौराणिक महत्व असलेली पुरातन सरस्वती नदी वहाते. या नदीची भाविक मनोभावे पूजा सुद्धा करीत असतात. परळी जवळच ब्रम्हगंगा, वेणूमती व परळीतून वाहणाऱ्या सरस्वती नदी या तिन्ही नदीचा संगम होतो. कालपरत्वे बारमाही वाहणारी नदी पावसाळयाच्या काळात चार–पाच महिने अजून सुद्धा वहात असते. पौराणिक महत्व असलेल्या या सरस्वती नदीला राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पाहणी करत नदी पुनर्जीवित करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

सरस्वती नदीतील हे अनधिकृत शॉपिंग कॉम्प्लेक्स नगरपरिषदेने स्वतःहून काढून टाकावे. परळीतील गावभागातील नागरिकांचे पुरापासून संरक्षण करावे या मागणीचे निवेदन गुरुवार, दि १७ एप्रिल रोजी परळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांना भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी दिले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शनिवारी परळीत महत्त्वपूर्ण बैठक

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ एप्रिल**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने परळी विधानसभा मतदारसंघाचा आढावा, पक्षाच्या विविध आघाडीवरील पदाधिकाऱ्यांच्या निवडी तथा कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याच्या अनुषंगाने शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. या बैठकीस बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह मान्यवर नेतेमंडळींची उपस्थिती असणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पक्षावर निष्ठा ठेवणाऱ्या सर्वांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक संपन्न होणार आहे. या बैठकीत मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण मुद्यांवर चर्चा केली जाणार असून, पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यासाठी पक्षाचे सर्व मार्गदर्शक नेतेमंडळी आढावा घेणार आहेत. या बैठकीस परळी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्यासह उत्तम दादा माने, मिनिनाथ दादा फड, देवराव महाराज लुगडे, बाबासाहेब शिंदे, जीवनराव देशमुख, एच.यू.फड, शंकर शेजुळ, वर्षाताई रायभोळे, कल्पनाताई देशमुख, रमेश ढाकणे, सोमनाथ भोसले, फिरोज सय्यद, कल्पनाताई देशमुख, मंगलताई सोळंके, अश्विनीताई सोळंके, दीपाली सावंत, अश्विनी सरवदे, हनुमंत फड, डॉ.जे.एन.शेख, गणेश देवकते, भीमराव हाके, प्रकाश राठोड, राजेश फड, शिवाजीराव नागरगोजे, शिवाजीराव लोमटे, भगवानराजे कदम, एकनाथ मुंडे, गोपाळराव सलगर, प्रकाश मुंडे, पप्पू गित्ते, समाधान मुंडे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.

# परळीत एक वही एक पेन अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

## माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी दिली भेट

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ एप्रिल**

महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत एक वही एक पेन हे अभियान परळी शहरात बाबासाहेबांच्या जयंती दिनी राबविण्यात आले. या अभियानास महाराष्ट्राचे माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी भेट दिली तसेच यावेळी त्यांनी या अभियानाचे कौतुक केले व त्यांच्या हस्ते चिमुकल्यांना वही,पेनचे वाटप करण्यात आले.



रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात युवा कार्यकर्ते विकास रोडे व पत्रकार विकास वाघमारे यांच्या संकल्पनेतून एक वही एक पेन अभियानाचे उद्घाटन इंटक चे युवक प्रदेश अध्यक्ष दत्तात्रय गुट्टे, रेल्वे पोलीस निरीक्षक बी.एस.कांबळे तर अध्यक्ष स्थानी मुफ्टाचे जिल्हा अध्यक्ष भैय्यासाहेब आदोडे होते.प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध विचारवंत अजयकुमार गंडले,लेखक, दिग्दर्शक प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे, जेष्ठ पत्रकार व साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव झिलमेवाड, संपादक अनिल सावंत, पृथ्वी शिंदे,पत्रकार संभाजी मुंडे, पत्रकार दत्ता काळे,सुजीत कांबळे, पत्रकार ओमप्रकाश बुरांडे, पत्रकार धीरज जंगले, अनंत कुलकर्णी,पत्रकार महादेव शिंदे, पत्रकार विजय रोडे,वसंतोष कोदरकर,डोंबे मामा, शिवाजीराव बनसोडे आदी उपस्थित होते.या अभियानास माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या सह रिपाईचे राज्य सचिव भास्कर नाना रोडे,भाजपाचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, जिल्हा परिषदेचे गट नेते अजय मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे,प्रा . दासू वाघमारे,सामाजिक कार्यकर्ते डॉ.विनोद जगतकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके,सिराजभाई,अनंत इंगळे,रवी मुळे, महेंद्र रोडे,भीमराव डावरे,प्रा.विलास रोडे, सुभाष वाघमारे,विलास ताटे , अँड.दिलीप उजगरे,लक्ष्मण वैराळ सर,मारोती वाघमारे आदी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विकास रोडे, पत्रकार विकास वाघमारे, प्रशांत रोडे, गौतम रोडे,नवनाथ दाने, विद्याधर सिरसाठ,आकाश देवरे, पत्रकार खांडेकर आदिंनी परिश्रम घेतले.

# बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी ना. पंकजाताई मुंडेंनी स्विकारली

**निर्घृण हत्येने मन सुन्न झाले ; धडाडीचा कार्यकर्ता गमावल्याचे दु:ख**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ एप्रिल**

भाजपचे लोकसभा विस्तारक बाबासाहेब आगे यांच्या निर्घृण हत्येनंतर त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी स्विकारली आहे. आगे यांच्या हत्येने मन सुन्न झाले, एक धडाडीचा कार्यकर्ता मी गमावला आहे अशा शब्दांत त्यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.

बाबासाहेब आगे यांची निर्घृण हत्या झाल्याची बातमी जेव्हा कानावर आली, ते ऐकून मन सुन्न झाले. काहीच सुचत नव्हते, त्यामुळे एका दिवसानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी या घटनेवर आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत. आगे हे भाजपचे धडाडीचे कार्यकर्ते होते, संघाचे संस्कार त्यांचेवर असल्याने प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याचा त्यांचा स्वभाव होता. माझ्या लोकसभा निवडणुकीत बुथ विस्तारक म्हणून अतिशय महत्वाची जबाबदारी त्यांनी खूप मेहनतीने पार पाडली. अशा मनमिळावू कार्यकर्त्याची अशा प्रकारे निर्घृण हत्या झाली हे ऐकून मनाला खूप वेदना झाल्या. या घटनेचा मी तीव्र निषेध करते. जिल्हयात आल्यानंतर पहिल्यांदा त्यांच्या पत्नी व कुटुंबाची भेट घेणार आहे. त्यांच्यावर कोसळलेल्या दुःखात माझा परिवार सहभागी आहे. आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी मी घेणार असून त्यांना सर्वतोपरी मदत करेल असं ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

# मराठी विज्ञान परिषदेच्या परीक्षेत खोलेश्वरच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरावर यश

## राज्यस्तरावर अक्षज जोशी पहिला तर व्यंकटेश नाटकर तृतीय



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ एप्रिल**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी याकरिता मराठी विज्ञान परिषदेच्या वतीने पोस्टाद्वारे विज्ञान परीक्षा आयोजित करण्यात आली होती.सदरील परीक्षा संपूर्ण राज्यभरातील ७वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती.यात खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील इ.९वी तील अक्षज शंतनू जोशी राज्यात पहिला,व्यंकटेश श्रीकृष्ण नाटकर राज्यात तिसरा,कौस्तुभ ज्ञानेश मातेकर प्रथम वर्ग,तर आदित्य जिजाराम कावळे द्वितीय वर्ग उत्तीर्ण झाले आहेत.या विद्यार्थ्यांना विज्ञान विषय शिक्षक मोरेश्वर देशपांडे,महानंदा मुंडे व सर्व विज्ञान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर,कार्यवाह किरण दादा कोदरकर,माध्यमिक विद्यालय शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,सर्व शालेय समितीचे सदस्य,विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,सर्व विज्ञान शिक्षक, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# ब्रह्माकुमारीजच्या मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी रतनमोहिनी यांच्या श्रद्धांजली सभेचे ब्रह्माकुमारीज आनंद सरोवर येथे मंगळवार, दिनांक २२ एप्रिल रोजी आयोजन

संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ एप्रिल**

ब्रह्माकुमारीजच्या मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी रतनमोहिनी यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या आठवणी व सेवा कार्याचे स्मरण करण्यासाठी ब्रह्माकुमारीज, आनंद सरोवर, अंबाजोगाई येथे मंगळवार, दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ७ ते ८ या वेळेत राजयोगिनी ब्रह्माकुमारी उषा दीदी (आंतरराष्ट्रीय राजयोगा मोटिवेशनल स्पीकर, माऊंट आबू, राजस्थान) यांचे प्रवचन होणार आहे. त्यानंतर सकाळी ८ ते ८.३० या वेळेत श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती अंबाजोगाई सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना अंबाजोगाई सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांनी सांगितले की, श्रद्धांजली सभेसाठी बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व्यवस्थापन प्रतिनिधी अर्चनाताई आडसकर आणि राजयोगिनी ब्रह्माकुमारी उषा दीदी (आंतरराष्ट्रीय राजयोगा मोटिवेशनल स्पीकर, माऊंट आबू, राजस्थान) हे अतिथी उपस्थित राहणार आहेत. तरी श्रद्धांजली सभेसाठी उपस्थित रहावे असे आवाहन अंबाजोगाई सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांनी केले आहे.

ब्रह्माकुमारीजच्या



राजयोगिनी दादी रतनमोहिनी जी
(मुख्य प्रशासिका, ब्रह्माकुमारीज)

आध्यात्मिक प्रमुख राजयोगिनी दादी रतनमोहिनीजी यांचा संक्षिप्त कार्य परिचय :

ब्रह्माकुमारीजच्या आध्यात्मिक प्रमुख राजयोगिनी दादी रतन मोहिनी यांचे नुकतेच वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले. त्यांनी जवळजवळ नऊ दशकांपर्यंत सेवा, शांती आणि आध्यात्मिक मार्गदर्शनाचा वारसा मागे सोडला. ब्रह्माकुमारी आध्यात्मिक संघटनेच्या मुख्य प्रशासक दादी रतन मोहिनी यांच्या निधनाने भारत शोकाकुल आहे. त्यांच्या प्रगल्भ आध्यात्मिकता, दयाळू नेतृत्व आणि सामाजिक सुधारणांप्रती अढळ वचनबध्दतेसाठी आदरणीय असलेल्या दादी रतन मोहिनी यांनी वयाच्या १०१ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने ब्रह्माकुमारींसाठी आणि त्यांच्या जीवनातून आणि शिकवणींपासून प्रेरणा घेतलेल्या लाखो लोकांसाठी एका युगाचा अंत झाला. ब्रह्माकुमारी आदरणीय दादीजी यांचे निधन हे सर्वांसाठी खूप दुःखद आहे. त्यांनी आयुष्यभर हजारो तरूण बहिणींना प्रशिक्षण देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय संस्कृती आणि मूल्यांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक पदयात्रा केल्या. दादी रतन मोहिनीजी यांनी चार वर्षांपूर्वी त्यांच्या पूर्वसुरी दादी हृदयमोहिनी यांच्या निधनानंतर ब्रह्माकुमारींच्या मुख्य प्रशासकाची भूमिका स्वीकारली. त्यांनी यापूर्वी चार दशकांहून अधिक काळ संघटनेच्या युवा शाखेच्या प्रमुख म्हणून काम केले होते, या काळात त्यांनी तरूणांच्या एका पिढीला आध्यात्मिक आणि मूल्यांवर आधारित जीवनशैली स्वीकारण्यास प्रेरित केले. त्यांच्या सर्वांत उल्लेखनीय कामगिरीपैकी एक म्हणजे २००६ मध्ये भारतभर मोठ्या प्रमाणात युवा मोर्चाचे नेतृत्व करणे, ज्याची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली. २५ मार्च १९२५ रोजी हैद्राबाद, सिंध (आता पाकिस्तान मध्ये) येथे जन्मलेल्या दादी रतन मोहिनी वयाच्या १३ व्या वर्षी ब्रह्मा कुमारींमध्ये सामील झाल्या. त्यांच्या ८८ वर्षांच्या आध्यात्मिक प्रवासात, त्या संस्थेच्या मध्यवर्ती स्तंभांपैकी एक बनल्या, त्यांनी विस्तार आणि सामाजिक संपर्काच्या प्रमुख टप्प्यांतून संस्थेचे मार्गदर्शन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली, ब्रह्मा कुमारींनी महिला सक्षमीकरण, युवा विकास, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन आणि योगिक शेती यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या मोहिमा सुरू केल्या. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे त्यांना २०१४ मध्ये गुलबर्गा विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेटसह अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले होते. दादी यांनी यज्ञ (ब्रह्माकुमारी) च्या मुख्य प्रशासकीय प्रमुख म्हणून सुमारे चार वर्षे काम केले. त्यांनी पुढील पदांवरही काम केले आहे. ज्यात राजयोग एज्युकेशन ॲण्ड रिसर्च फाऊंडेशनच्या युवा शाखेचे अध्यक्ष, माऊंट आबू येथील बीके मुख्यालयाच्या कार्मिक विभागाचे संचालक., राजस्थान झोन मधील ब्रह्माकुमारी केंद्रांचे विभागीय प्रमुख, भारतातील शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालक म्हणून सातत्यपूर्ण कार्य केले. त्यांचे गुणविशेष असे की, त्या एक श्रेष्ठ विचारवंत, कोणत्याही आध्यात्मिक विषयावरील अंतर्दृष्टीपूर्ण वक्ता, दयाळूपणा, खूप नम्र, सेवेसाठी सदैव तयार आध्यात्मिकदृष्ट्या परिपक्व नेहमी हसणारा सर्वांना आनंदी करते. दादी पवित्रता, शांती आणि उदात्त उद्देशाच्या जीवनाचे उदाहरण देतात. रतन मोहिनीजी दादी यांना अनेकजण आदर्श ब्रह्माकुमारी म्हणून पाहतात हे विशेष होय.

# एखाद्याने शिकून किती मोठं व्हावं हे संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडून शिकले पाहिजे–सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ एप्रिल**

सामाजिक विषमतेमुळे झालेले अन्याय सहन करून त्यापासून प्रेरणा घेवून एखाद्याने शिकून ज्ञानी व्हावं केवळ ज्ञानीच नाही तर या जगावर आपल्या बुद्धिमत्तेने राज्य करावं ,स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहावी आणि परदेशी विद्यापीठांमध्ये त्यांच्या नावाचे पुतळे उभे केले जावे आणि त्या पुतळ्याखाली 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' अर्थात 'ज्ञानाचे प्रतीक' असे लिहिले जावे. एवढे मोठे माणसाला होते आले पाहिजे त्याकरिता जीवनभर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श समाजातील प्रत्येक व्यक्तीने घेणे गरजेचे आहे असे मत अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.



महात्मा फुले स्मारक नगर येथे प्रथमच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या थाटामाटात आणि जल्लोषात व वैचारिक प्रबोधन करून साजरी केली गेली त्यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.मधुकरराव इंगोले, बी.एल.ओव्हाळ, बी.के.मसने, पीएसआय जाधव, शासकीय महाविद्यालयाच्या विभागप्रमुख प्रा.डॉ.विद्या इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मधुकरराव इंगोले व बी.एल.ओव्हाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करून तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनप्रवास उलगडून दाखवत असताना महापुरुषांचे विचार व त्या विचारांचे वारसदार यांनी समाजामध्ये कशा पद्धतीने जगले पाहिजे आणि आपल्या सोबत इतर समाजही कसा प्रगल्भ ज्ञानी आणि समृद्ध केला पाहिजे याविषयी विवेचन केले. क्रांती आणि प्रतिक्रांती या एकाच गतीने एकाच वेळी एकाच दिशेने मार्गक्रमण करत असतात त्यामुळे क्रांतीचा विचार ज्यांनी हृदयामध्ये तेवत ठेवलेला आहे त्यांनी या गोष्टीचा विचार करून समाजप्रबोधनाकडे विशेषत्वाने लक्ष दिले पाहिजे अन्यथा प्रतिक्रांती ही क्रांतीचे विचार आणि प्रगल्भता याला झाकून ठेवण्याचे काम करते असे प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी केले. यावेळी बोलताना बी.एल.ओहाळ यांनी माळीनगर येथील महात्मा फुले स्मारक ही संकल्पना प्रा.मधुकरराव इंगोले यांची होती आणि त्यांनी त्यासाठी इथे स्मारकाची जागा राखून ठेवली ही आठवण सांगितले आणि हे स्मारक होण्यासाठी आता येथील नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली पुरोगामी चळवळीतला कार्यकर्ता हा सदैव सजग आणि सावध असला पाहिजे कारण बदलती सामाजिक परिस्थिती अशा कार्यकर्त्यांना अधिक जबाबदारीने कार्य करण्याची संधी देते असे मत ओव्हाळ यांनी व्यक्त केले. प्रा.डॉ.विद्या इंगोले यांनी बहुजनांना गावकुसाबाहेर बसवली जात होते सामाजिक प्रवाहामध्ये येण्याची त्यांना कुठली ही संधी नव्हती क्षैक्षणिक सांस्कृतिक व सामाजिक अभिसरण प्रक्रियेत बहुजनांना कुठलीही स्थान नव्हते ते स्थान प्राप्त करून देण्याचे महान कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांसाठी केले हे उपकार बहुजन समाजाने विसरले नाही पाहिजे असे प्रतिपादन केले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अनिल नरसिंगे व सूत्रसंचालन किरण चक्रे यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप रत्नदीप गोरे यांनी केला. तर उपस्थितांचे आभार ढगे सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुनिल नरसिंगे, संजय साळवे, विजय कचरे, आदित्य कदम यांच्यासह परिसरातील नागरिकांनी परिश्रम घेतले.